कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

बुधवार ०८ जुलै २०२६ | वर्ष : ६ | अंक : १८८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Wednesday, 08 July 2026 | Year : 6 | Issue : 188 | Daily | Rate: Rs. 5/-

**दि. ०८ जुलै २०२६**



१९४५ : ८ जुलै १९४५ रोजी त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. सिद्धार्थ आणि मिलिंद याच सोसायटीच्या माध्यमातून बाबासाहेबांनी मुंबईत 'सिद्धार्थ महाविद्यालय' आणि औरंगाबाद येथे 'मिलिंद महाविद्यालय' यांसारख्या नामांकित शिक्षण संस्था सुरू केल्या. आज या संस्थेच्या अनेक शाखा व महाविद्यालये कार्यरत आहेत. संकलन प्रा. यशवंत दुपटे

# अतिवृष्टीचा फटका

## शेतकऱ्यांनो, पेरणीची घाई नको

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून मुंबईसह राज्याला पावसाने चांगलेच झोडपले आहे. अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली. शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीचे नियोजन करावे. राज्यातील ज्या भागांमध्ये अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही, तेथील शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ८ जुलै रोजी देशातील १३ राज्यांत जसे की, उत्तर प्रदेश, दिल्ली, बिहार, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि केरळमध्ये मुसळधार पाऊस आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच या काळात काही ठिकाणी ताशी ८५ किलोमीटर वेगापर्यंत वारे वाहतील, असे सांगितले जात आहे.

## कोयना धरणात ८ TMC पाण्याची आवक

**कराड :** पश्चिम घाटमाथा आणि कोयना पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार ते अतिवृष्टीमुळे संपूर्ण संपूर्ण घाट प्रदेशासह कृष्णा, कोयना नद्यांवरकाठी सलग पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे, कोयना धरणातील पाणीसाठ्यात प्रचंड वेगाने वाढ होत आहे. गेल्या २४ तासांत कोयना धरणात तब्बल ८.०३ टीएमसी / अब्ज घनफूट (९३,०२० क्युसेक वेगाने) नव्या पाण्याची आवक झाली असून एकूण धरणसाठा ३३.९२ टक्क्यांवर पोहोचला आहे. अपेक्षेप्रमाणे कोयनेचा जलसाठा एक तृतीयांश झाला आहे.



## मिसिंग लिंकच्या कामावरून आजी - माजी मुख्यमंत्र्यांमध्ये जुंपली

मुंबई : मुंबई – पुणे महामार्गावरील मिसिंग लिंकची मूळ कल्पना काँग्रेस आघाडी सरकारच्या काळातीलच होती. त्यानुसार आमच्या सरकारने व्यवहार्य अहवाल तयार केला होता. पण पर्यावरण तसेच सुरक्षेचे मुद्दे उपस्थित झाल्याने तेव्हा मान्यता दिली नव्हती. या प्रस्तावित मार्गाची फेरतपासणी करण्याचा आदेश मी तेव्हा दिला होता, असे प्रत्युत्तर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. एकूणच या कामावरून आजी – माजी मुख्यमंत्र्यांमध्ये जुंपल्याचे चित्र दिसते. मिसिंग लिंकवर दरड कोसळल्याने कामाच्या दर्जावरून विरोधी पक्षाने टीका केली होती. विशेषतः काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घाईघाईत करण्यात आलेल्या कामाबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्याला प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी १३ आक्षेप नोंदवीत प्रकल्पाला स्थगिती दिली होती, असे निदर्शनास आणून दिले होते.

## अतिवृष्टीचा आयटीआय प्रवेशावर परिणाम

**मुंबई :** राज्यातील अनेक भागांत कोसळणाऱ्या मुसळधार पावसाचा परिणाम आता औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्रवेश प्रक्रियेवरही झाला आहे. केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीत जागा मिळालेल्या ७८ हजार ४९६ विद्यार्थ्यांपैकी सोमवारी सायंकाळपर्यंत केवळ २९ हजार २४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. प्रवेश निश्चितीसाठी मंगळवारी सायंकाळी ५ पर्यंत मुदत देण्यात आली असून विद्यार्थ्यांनी मुदतवाढीची मागणी केली आहे.

## मुसळधार पावसाचा एसटी महामंडळाला २.३० कोटींचा फटका

**मुंबई : गेल्या काही दिवसांपासून पावसाने जोर धरला असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. राज्यभरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका राज्य परिवहन महामंडळालाही (एसटी) बसला. सोमवारी वादळवाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीमुळे एसटी महामंडळाचे प्रचंड नुकसान झाले. गेल्या दोन दिवसांत राज्यभरातील तब्बल ७,८२० एसटी फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. यामुळे एसटी महामंडळाचे सुमारे २.३० कोटी रुपयांचे उत्पन्न बुडाले.**

## 'कॉकरोच जनता पार्टी'च्या 'एक्स' अकाउंटवरील बंदी उठविली




**नवी दिल्ली :** कॉकरोच जनता पार्टीला मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने सीजीपीचे X खाते अनब्लॉक करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्र सरकारच्या वतीने न्यायालयात हजर झालेले सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी हे खाते का ब्लॉक करण्यात आलं होते याचे कारण स्पष्ट केल्यानंतर, न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी हा आदेश दिला. कॉकरोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजीत दिपके यांनीही यासंदर्भातील माहिती त्यांच्या एक्स खात्यावरून दिली. मेहता यांनी न्यायालयात सांगितले की, NEET फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला होता, कारण पक्षाच्या काही पोस्ट्समुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होऊ शकले असते. मात्र, आता ही परीक्षा पार पडली असल्याने ही चिंता उरलेली नाही, असेही त्यांनी पुढे नमूद केले. हे म्हणणे विचारात घेत न्यायमूर्ती शर्मा यांनी X खाते पूर्ववत करण्याचे आदेश दिले आणि सांगितले की, "खाते ब्लॉक करण्यामागील मूळ कारण आता प्रासंगिक राहिलेले नाही."

कॉकरोच जनता पार्टीची सुरुवात एक उपरोधात्मक संघटना म्हणून झाली होती. परंतु, नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर विद्यार्थी आणि पालकांमध्ये पसरलेल्या तीव्र असंतोषानंतर या संघटनेला तरुणांमध्ये मोठी लोकप्रियता मिळाली. सीजीपीला सोशल मीडियावर प्रचंड फॉलोअर्स मिळत असतानाच, मे महिन्यात त्यांचं X खातं भारतात ब्लॉक करण्यात आलं. एक्सच्या नियमांनुसार, जेव्हा एखाद्या अधिकृत संस्थेकडून वैध आणि योग्य विनंती प्राप्त होते, तेव्हा ठराविक देशात विशिष्ट मजकुराचा प्रवेश रोखणं आवश्यक असते यानंतर लगेचच सीजीपीने 'कॉकरोच इज बॅक' या नावाने नवीन खाते सुरू केले. पक्ष अजूनही नियमित अपडेट्ससाठी याच खात्याचा वापर करत आहे. विशेष म्हणजे, नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत सीजीपीने दिल्लीतील जंतरमंतरवर मोठी आंदोलने केली आहेत. दरम्यान, या मुद्द्यावर कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या बेमुदत उपोषणाचा आज मंगळवारी १० वा दिवस होता. तसेच, दीपके यांनीही सोमवारी महाराष्ट्राचा दौरा केला आणि त्यांचे मूळ गाव असलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये पेपरफुटीविरोधात आयोजित विद्यार्थी आंदोलनात भाग घेतला.

# महत्वाच्या बातम्या

## वसई-विरारमध्ये रस्ते पाण्याखालीच

**मुंबई :** अतिमुसळधार पावसामुळे वसई-विरार भागात पूरपरिस्थिती उद्‌भवली. पावसाचा जोर कमी झाल्यानंतरही पाणी ओसरण्याचा वेग कमीच असल्याने अजूनही रस्ते पाण्याखालीच आहेत. त्याचा परिणाम मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वाहतुकीवरही झाला आहे.

## ठाण्यातील जू गावाचा संपर्क पूर्ण तुटला

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात असलेल्या भिवंडी तालुक्यातील खडवली परिसरात मुसळधार पाऊस कोसळत आहेत. पावसामुळे खडवली पश्चिम येथील जू गावाला जोडणारा नदीवरील पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे गावाचा बाहेरील भागाशी संपर्क पूर्णपणे तुटला आहे.या घटनेची माहिती मिळाल्यानंतर कल्याणचे तहसीलदार विकास गारुडकर, मंडळ अधिकारी दर्शना भावे, तलाठी आरती कराडे, ग्रामसेवक बी. बी. पष्टे, प्रशासकीय अधिकारी प्रियांका भोईर, खडवली पोलिस ठाण्याचे पीएसआय विजय डावखोरे तसेच पोलिस आणि ग्रामपंचायत कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

## तुकारामांचा जयघोषासहित देहूतून पालखी प्रस्थान

**देहूगाव :** श्री संत तुकाराम महाराजांच्या आषाढीवारी पायी पालखी सोहळ्याचे आज पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून तयारी पूर्ण झाली आहे. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ग्यानबा तुकारामांच्या जयघोषात पालखी प्रस्थान सोहळा सुरु झाला आहे. पुढे इनामदार वाड्यात जाऊन पालखीचा आजचा मुक्काम असेल. त्यानंतर चांदीच्या रथातून पालखी पुण्याकडे प्रस्थान ठेवणार आहे.

## रत्नागिरीत कशेडी घाटात दरड कोसळली

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यात दोन दिवसांपासून मुसळधार पावसाबरोबरच वादळी वाऱ्याचाही जोर वाढला आहे. पावसाच्या संततधारेने जिल्ह्यातील नद्यांच्या पातळीत वाढ झाली आहे. सोमवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाल्याने खेडमधील जगबुडी नदीने ओलांडलेल्या धोक्याच्या पातळीमध्ये घट झाली आहे. पावसामुळे कशेडी घाटात रविवारी रात्री दरड कोसळल्याने मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली होती. मात्र सोमवारी दुपारी दरड हटविण्यात आल्याने १२ तासांनी एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली. तसेच चिपळूण आणि राजापुरातील पुराचे पाणी ओसरले आहे.

## अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील ३८ दहशतवाद्यांची फाशी कायम

**अहमदाबाद :** २००८ च्या अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी मंगळवारी गुजरात उच्च न्यायालयाने अत्यंत महत्वाचा निर्णय सुनावला. विशेष न्यायालयाच्या आदेशावर शिक्कामोर्तब करत उच्च न्यायालयाने ३८ दहशतवाद्यांची फाशी आणि ११ जणांची जन्मठेप कायम ठेवली आहे. तसेच, स्फोटांमध्ये मरण पावलेल्या ५६ जणांच्या नातलगांना प्रत्येकी १० लाख रुपये, तर २०० हून अधिक जखमींना प्रत्येकी १ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने यावेळी दिले. अहमदाबाद येथे २६ जुलै २००८ रोजी, केवळ ७० मिनिटांत एकापाठोपाठ एक असे तब्बल २१ बॉम्बस्फोट झाले होते.

## पाथरपुंज व चांदोली धरणक्षेत्रात अतिवृष्टी

**सांगली :** शिराळा तालुक्यात इतरत्र पावसाचा जोर मंदावला असला तरीही चांदोली धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या तीन..चार दिवसापासून अतिवृष्टी सुरूच आहे. गेल्या २४ तासात चांदोली धरण परिसरात ११८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.



## वायनाडमधील भीषण भूस्खलन

**वायनाड :** केरळमधील वायनाड येथे झालेल्या विनाशकारी भूस्खलनामुळे मृतांचा आकडा चारवर पोहोचला आहे. ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्या चार बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी अनेक संस्थांच्या सहभागाने एक मोठी बचाव मोहीम सुरू आहे. दरम्यान, भूस्खलनाचा एक भयानक व्हिडिओ समोर आला आहे. भूस्खलनाच्या व्हिडिओमध्ये एक टँकर, एक बस आणि अनेक लोक वेगाने वाहणाऱ्या ढिगाऱ्याखाली आणि पाण्यात वाहून जाताना दिसत आहेत. व्हिडिओमध्ये टँकर आणि बस अनेकशे मीटर मागे सरकताना दिसत असून, त्यात अनेक लोक अडकले आहेत. काही लोक भूस्खलनातून बचावले, परंतु आणखी बरेच लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे.

प्रत्यक्षदर्शी अजमलने त्या भयानक दृश्याचे वर्णन करताना सांगितले 'आधी आम्हाला एक अस्पष्ट आवाज ऐकू आला. आम्ही सर्वजण ताबडतोब दुकानातून बाहेर धावलो. सुरुवातीला, डोंगराचा फक्त एक छोटासा भाग घसरत असल्याचे दिसत होते, पण काही वेळातच त्याचे एका मोठ्या भूस्खलनात रूपांतर झाले. आम्ही ताबडतोब जवळच्या लोकांना पळून जाण्यास सांगितले. बरेच लोक बस स्टॉपवर उभे होते आणि काही मजूरही काम करत होते. त्याच वेळी, पुलाच्या पलीकडे उभा असलेला एक टँकर भूस्खलनात सापडला आणि आमच्या दिशेने वाहत आला. माझ्या मते १० ते १५ लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहेत. आतापर्यंत चार जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. पुलावरील लोक नदीत पडले की ढिगाऱ्याखाली अडकले आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.'

दहा जखमींवर दोन रुग्णालयांमध्ये उपचार सुरू असून, ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांपर्यंत पोहोचण्यासाठी बचाव पथके शर्थीचे प्रयत्न करत आहेत. या मोठ्या भूस्खलनात एक चर्च आणि जवळचे एक घरही वाहून गेले.

युद्धपातळीवर बचावकार्य सुरू असून, मोठ्या प्रमाणातील ढिगारा हटवण्यासाठी आणि बेपत्ता लोकांचा शोध घेण्यासाठी अवजड यंत्रसामग्रीचा वापर केला जात आहे. कल्लाडी येथील मीनाक्षी पुलाजवळ भूस्खलन झाले.

## शरद पवार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत? ... म्हणून फडणवीसांनी ढगफुटीची अफवा पसरवली : काँग्रेस

**मुंबई :** राजकारणात कधी काय होईल याचा अंदाज बांधणे कठीण असते. गेल्या महिन्यात ठाकरे गटातील सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यानंतर ठाकरे गटाचे विधानपरिषदेचे आमदार सचिन अहिर यांनीही शिंदे गटाची कास धरली. यादरम्यान ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. त्यातच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि भाजपाचे विनोद तावडे यांच्यात गुप्त बैठक झाल्याचे वृत्त काही प्रसारमाध्यमांनी दिल्याने या चर्चांनी आणखीनच जोर पकडला. मात्र, शरद पवार यांच्या कन्या व खासदार सुप्रिया सुळे यांनी या सर्व चर्चांनी खंडन केले. सध्या ज्या काही चर्चा सुरू आहेत, त्याची मला गंमत वाटते, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. त्यामुळे शरद पवार हे भाजपाबरोबर जाणार असल्याच्या अफवांना सध्यातरी पूर्णविराम मिळाला आहे.

अयोध्येतील श्रीराम मंदिरात झालेल्या दान चोरी प्रकरणाच्या विरोधात नाशिकच्या पंचवटी येथील प्रसिद्ध काळाराम मंदिराबाहेर काँग्रेसतर्फे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यासह परिसरातील शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला होता. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केला. आमचे आंदोलन आंदोलन चिरडले जावे आणि



लोकांनी आंदोलनाला येऊ नये, म्हणून फडणवीस यांनी नाशिकमध्ये ढगफुटीची अफवा पसरवली. कुठलाही धोका नसताना त्र्यंबकेश्वरमध्ये ढगफुटी होणार असल्याचा फुगवटा तयार करण्यात आला, असा आरोप सपकाळ यांनी केला. फडणवीस यांचा कारभार सुलतानी असून त्यांना शेतकऱ्यांशी काहीही देणे-घेणे नाही. सध्या ते फोडाफोडीत व्यस्त असल्याची टीकाही सपकाळ यांनी केली. त्यांच्या या टीकेवर आता भाजपाकडून काय प्रतिक्रिया दिली जाणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नावाने बनावट कागदपत्रे तयार करून रमाई आवास योजनेतील घरे लाटण्याचा प्रयत्न झाला, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे विधानपरिषदेचे आमदार अंबादास दानवे यांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. विशेष बाब म्हणजे, यावेळी सरकारकडूनही रमाई आवास योजनेत घरे लाटण्याचा प्रयत्न झाल्याची कबुली देण्यात आली. या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

## 'गोरस' भांडारवरील कारवाई बेकायदेशीर : उच्च न्यायालय




**नागपूर :** वर्धा येथील गो दुग्ध उत्पादक सहकारी संस्थेच्या मार्फत संचालित गोरस भंडारवर एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार अन्न व औषधी प्रशासनाने (एफडीए) ३१ मे रोजी अचानक छापा टाकला. या धडक कारवाईत तब्बल २५ लाख ८६ हजार १६८ रुपयांचा असुरक्षित दुग्धजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. यानंतर एफडीएने गोरस भंडारला तातडीने बंद करण्याचे आदेश दिले. या कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले गेले. कुठलेही नोटीस न बजावता थेट कारवाई केल्याबाबत उच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. मंगळवारी न्यायालयाने याप्रकरणी तुकाराम मुंढे यांच्या एफडीएची कारवाई बेकायदेशीर ठरवली. गोरस भंडारमार्फत दररोज सुमारे नऊ हजार लीटर दुधाचे संकलन व वितरण केले जाते. वर्धा जिल्ह्यातील १५ गावांमधील सुमारे ८०० कुटुंबांचा उदरनिर्वाह या माध्यमातून होतो. ३१ मे रोजी विभागाने गोरस भंडारची तपासणी केली. परिसरात स्वच्छतेचा अभाव असल्याचा दावा करत गोरस भंडारला टाळे लावण्यात आले. तसेच दूध संकलन, विक्री आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन पुढील आदेशापर्यंत थांबवण्याचे निर्देशही दिले गेले. तुकाराम मुंढे यांच्या विभागाच्या कारवाईमुळे शेतकरी व दूध उत्पादकांचे मोठे नुकसान होत असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. मागील आठवड्यात न्यायालयाने या कारवाईचे कारण स्पष्ट करण्याबाबत नोटीस बजावली होती. अन्न व औषध विभागाने शपथपत्र दाखल करत नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून कारवाई केली असल्याचे माहिती न्यायालयाला दिली. नियमांचे पालन न केल्यामुळे जर एखाद्यावर कारवाई केली जाते तर मग कायदेशीर नियमांचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात येऊ नये? असे न्यायालयाने विचारले.

## (SIR) मोहिमेंतर्गत मतदार यादी दुरुस्ती व पडताळणीचे काम संथ

**नागपूर :** मतदार याद्यांच्या दुरुस्तीसाठी भारत निवडणूक आयोगाकडूनन विशेष सखोल पुनरीक्षणची (एसआयआर) प्रक्रिया राबवण्यात येत आहे. काही राज्यात ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून आता महाराष्ट्रात राबवण्यात येत आहे. यापूर्वी ज्या राज्यात ही प्रक्रिया राबवण्यात आली तिथे लाखो मतदारांची नावे कमी करण्यात आली. परिणामी त्यांनी निवडणुकीत मतदानच करता आले नाही. या मोहिमेंतर्गत मतदान केंद्र स्तरीय अधिकाऱ्याला (बीएलओ) प्रत्येक घरी जाऊन मतदारांकडून 'एन्युमरेशन फॉर्म' भरून घेणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया सुरू होऊन आज आठ दिवसांवर झाले असून अजून बीएलओ नागरिकांच्या घरी पोहचले नाही.

एसआयआर मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ दरम्यान बीएलओंना प्रत्येक घरी जाऊन मतदारांकडून 'एन्युमरेशन फॉर्म' भरून घेणे आवश्यक आहे. नागपूर जिल्ह्यात एकूण ४६ लाख ३८ हजार ५८९ मतदार आहेत. जिल्हा प्रशासनाच्या आकडेवारीनुसार यापैकी ३२ लाख ४३ हजारांवर मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून, उर्वरित मतदारांचे मॅपिंग शिल्लक आहे. एसआयआरच्या कामासाठी ४ हजार ६१० बीएलओ नियुक्त करण्यात आले आहेत. शहरात ही जबाबदारी प्रामुख्याने शिक्षक, कर निरीक्षक, लिपीक, अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर्स यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. बीएलओ म्हणून जबादारी असलेल्या शिक्षकांना शाळा करून हे काम करायचे आहे. तर अंगणवाडी सेविका, आशा वर्कर या आपल्या दैनंदिन कार्यालयीन कार्यात



व्यस्त असल्याने अनेक मतदारापर्यंत ते पोहोचू शकलेले नाहीत. एकूणच जिल्ह्यात ही एसआयआरची प्रक्रिया सुरू आहे किंवा नाही, हेच मतदारांना कळायला मार्ग नाही. त्यामुळे आता एसआयआरचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने काम न करणाऱ्या बीएलओंची माहिती मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून मागवण्यात येत आहे. एसआयआरची गती संथ आहे. वेळेत ही प्रक्रिया पूर्ण न झाल्यास लोक मतदार होण्यापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. अनेक बीएलओंना त्यांच्या कार्यरत परिसराऐवजी दूरच्या भागात नियुक्त करण्यात आल्याने संबंधित मतदारांची ओळख आणि परिसराचे मॅपिंग अद्याप पूर्ण झालेले नाही. अनेक बीएलओंना मतदारांचे पत्ते किंवा परिसराची पुरेशी माहिती नसल्याचे समोर येत आहे. त्यामुळे घरभेटी, मतदार पडताळणी आणि फॉर्म भरण्याची प्रक्रिया वेळेत व अचूकपणे पूर्ण होणार का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. बीएलओ म्हणून नियुक्ती असलेल्या अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, लिपीक आदी जर एसआयआरचे काम करत नसेल, त्यांची यादी मागवली असून, त्यांच्यावर जिल्हा प्रशासनाकडून प्रसंगी कारवाई करण्यात येईल, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. रचना इंदूरकर यांनी सांगितले.






बुधवार, ०८ जुलै २०२६
Wednesday, 08 July 2026

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



“ समाधानी राहिल्यास जीवन अधिक सुखी होते... ”

## बहुजन सौरभ संपादकीय

# युवकांची काळजी की संघाची राजकीय खेळी?

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी अलीकडेच ‘टीव्ही आणि गुगलबाबामुळे, तरूण एकाकी पिढी’ या आशयातून युवकांमध्ये वाढत चाललेला एकाकीपणा, मानसिक आरोग्याच्या समस्या आणि सामाजिक तुटलेपणाबाबत चिंता व्यक्त केली. बदलती जीवनशैली, कुटुंबव्यवस्थेतील बदल, मोबाईल आणि सोशल मीडियाचे वाढते आकर्षण यामुळे युवक मानसिकदृष्ट्या कमकुवत होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. वरकरणी ही चिंता योग्य आणि आवश्यक वाटते. परंतु या वक्तव्यामागील राजकीय आणि वैचारिक संदर्भ तपासणेही तितकेच महत्त्वाचे आहे. देशातील युवक आज बेरोजगारी, महागाई, शिक्षणाचे व्यापारीकरण, स्पर्धा परीक्षा घोटाळे, कंत्राटी नोकऱ्या, शेतकरी कुटुंबांची बिकट अवस्था आणि वाढती आर्थिक विषमता यांसारख्या गंभीर प्रश्नांशी झुंज देत आहेत. या वास्तवामुळे निर्माण होणारा नैराश्याचा प्रश्न हा केवळ ‘एकाकीपणा’ म्हणून मांडणे म्हणजे मूळ कारणांवर पडदा टाकण्याचा प्रयत्न नाही का, असा प्रश्न निर्माण होतो. युवकांमधील मानसिक तणावाचे खरे कारण सामाजिक माध्यमे किंवा पाश्चात्त्य जीवनशैली इतकेच नसून, रोजगाराच्या संधींचा अभाव, भविष्याबाबतची असुरक्षितता आणि असमान विकासही आहे. या प्रश्नांवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सातत्याने ठोस भूमिका घेतल्याचे फारसे दिसत नाही. त्यामुळे आता व्यक्त झालेली चिंता ही सामाजिक जबाबदारीपेक्षा प्रतिमानिर्मितीचा भाग आहे का, अशी शंका निर्माण होते. संघाने अनेक दशकांपासून राष्ट्रवाद, संस्कृती आणि संघटन यांवर भर दिला. परंतु युवकांच्या वैज्ञानिक विचारसरणी, संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय, जातिनिर्मूलन आणि रोजगार या मूलभूत प्रश्नांवर त्यांची भूमिका अनेकदा संदिग्ध राहिली आहे. आज मानसिक आरोग्याचा विषय पुढे आणताना या व्यापक सामाजिक वास्तवाकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरत नाही. आजचा युवक प्रश्न विचारतो. तो केवळ भावनिक घोषणांवर विश्वास ठेवत नाही. त्याला रोजगार हवा आहे, गुणवत्तापूर्ण शिक्षण हवे आहे, अभिव्यक्ती स्वातंत्र्य हवे आहे आणि समान संधी हव्यात. त्यामुळे युवकांना केवळ नैतिकतेचे धडे देऊन त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी धोरणात्मक बदल आणि उत्तरदायी शासन आवश्यक आहे. मोहन भागवत यांच्या वक्तव्यामागे आणखी एक राजकीय संदर्भही दिसतो. देशात युवकांमध्ये वाढत असलेली अस्वस्थता, विविध भरती प्रक्रियांतील विलंब, पेपरफुटीच्या घटना आणि रोजगाराच्या प्रश्नावर वाढणारा रोष यामुळे सामाजिक असंतोष वाढत आहे. अशावेळी चर्चेचा केंद्रबिंदू आर्थिक प्रश्नांवरून मानसिक आरोग्याकडे वळविण्याचा प्रयत्न होत आहे का, याचाही विचार करावा लागेल. याचा अर्थ मानसिक आरोग्य महत्त्वाचे नाही असा अजिबात नाही. उलट ते अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु मानसिक आरोग्याचा प्रश्न सामाजिक आणि आर्थिक न्यायापासून वेगळा करून पाहता येणार नाही. बेरोजगारी, गरिबी आणि अन्याय यामुळे निर्माण होणारा ताण लक्षात न घेता केवळ ‘एकाकी पिढी’ असे म्हणणे अपुरे ठरते. युवकांना आज प्रेरणा हवी आहे; पण त्याहून अधिक संधी हव्या आहेत. त्यांना संस्कारांसोबत संविधानिक मूल्यांचे भान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक समतेची हमीही हवी आहे. केवळ सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या चौकटीत युवकांचे भविष्य घडणार नाही. त्यासाठी शिक्षण, रोजगार, संशोधन, उद्योग आणि सामाजिक न्याय या क्षेत्रांत ठोस कृती आवश्यक आहे. मोहन भागवत यांच्या विधानाचे स्वागत तेव्हाच अर्थपूर्ण ठरेल, जेव्हा संघ आणि त्याच्या वैचारिक परिवाराकडून युवकांच्या रोजगार, शिक्षण, सामाजिक समता आणि संविधानिक हक्कांबाबतही तितक्याच ठामपणे भूमिका मांडल्या जातील. अन्यथा अशा प्रकारची चिंता ही वास्तवातील प्रश्नांवर पडदा टाकणारी किंवा वैचारिक प्रभाव टिकवून ठेवण्याची रणनीती असल्याची टीका होत राहील. आज भारताच्या युवकांना उपदेशापेक्षा संधी, घोषणांपेक्षा कृती आणि भावनिक आवाहनांपेक्षा न्याय्य व्यवस्था हवी आहे. देशाचे भविष्य घडवायचे असेल तर युवकांच्या मानसिक आरोग्याइतकीच त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि लोकशाही हक्कांचीही काळजी घ्यावी लागेल. तेव्हाच ही चिंता प्रामाणिक आणि विश्वासार्ह ठरेल.●●

# आरक्षणाचा इतिहास आणि तत्त्वज्ञान

भारतीय समाजाने आरक्षणाचा इतिहास आणि आरक्षणाचे तत्त्वज्ञान समजून घेण्याची तसदी कधी घेतलीच नाही. आरक्षणाविषयीच्या या अज्ञानामुळेच आज सत्तासंपन्न वर्गासह समाजातील प्रत्येक घटकाकडून आरक्षणाची मागणी केली जात आहे; आज सत्तासंपन्न वर्गानेसुद्धा स्वतःसाठी EWS कोटयाद्वारे शासकीय सेवांमध्ये १० टक्के आरक्षण पदरात पाडून घेतले आहे. भारतातील आरक्षणाची संकल्पना ही स्वतंत्र आणि लोकशाहीवादी भारताच्या निर्मितीच्या प्रक्रियेशी थेट जोडलेली असून, तिला १२० वर्षांहून अधिक काळचा इतिहास आहे. वस्तुस्थिती अशी आहे कि, जगातील ज्या ज्या देशांमध्ये एकापेक्षा जास्त वांशिक-धार्मिक किंवा सामाजिक गट आहेत, त्यांनी कोणत्या ना कोणत्या व्यवस्थेच्या माध्यमातून प्रतिनिधित्वाचा हा प्रश्न सोडवला आहे आणि आरक्षण ही त्यापैकीच एक प्रतिनिधित्वाची पद्धत आहे. आजच्या तुलनेत पाहिले तर लोकशाही हक्कांचे रक्षण, संवर्धन आणि अंमलबजावणी या संदर्भात ब्रिटिश संसद आणि भारतातील ब्रिटिश राजवट ही लोकशाही हक्कांची खरी संरक्षक ठरली आहे. ब्रिटिश राजवटीने १९०९ मध्येच भारतातील शासन-प्रशासनात लोकांचा सहभाग वाढवण्याची प्रक्रिया सुरू केली; जी खऱ्या लोकशाहीचा आत्मा आहे. ब्रिटिशांनी भारतातील सर्व वांशिक-धार्मिक गटांचा शासन-प्रशासनात सहभाग निश्चित करण्यासाठी 'मॉर्ले-मिंटो' समितीची नेमणूक केली होती. या समितीने केलेल्या शिफारसीनुसार भारतातील धार्मिक आणि वांशिक गटांना शासन-प्रशासनात सहभागी करून घेण्यासाठी त्यांची लोकसंख्या निश्चित करणे अवस्याक होते. यामुळेच सन १९११ मध्ये जी जनगणना करण्यात आली त्यामध्ये पहिल्यांदाच प्रत्येक जात आणि धर्माच्या लोकांची संख्या मोजण्यात आली. जनगणनेच्या या अकडेवारीतून समोर आलेल्या वस्तुस्थितीवरून असे सिद्ध झाले की, भारतीय समाजात तीन मुख्य वांशिक-धार्मिक गट अस्तित्वात होते. या गटांना शासन-प्रशासनात सहभागी करून घेण्यासाठी पुढे मॉन्टेग्यू-चेम्सफर्ड सुधारणाच्या माध्यमातून स्थानिक सत्तेत भारतीय लोकांना सहभागी करण्याची शिफारस करण्यात आली व १९१९ च्या कायद्यातून त्याची अंमलबजावणी करण्याचे जाहिर करण्यात आले.



पहिला आणि सर्वात मोठा गट असा होता, ज्याचे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील नेतृत्व एका अतिसूक्ष्म अल्पसंख्याक वर्गाच्या हातात होते; हा वर्ग जवळपास ३,००० वर्षांपूर्वी भारतीय उपखंडात आला होता. या लोकांनी बहुतांश स्थानिक लोकसंख्येला स्वतःमध्ये सामावून घेतले आणि ही प्रक्रिया सोपी करण्यासाठी त्यांनी आपली ओळख 'सनातन'वरून बदलून 'हिंदू' अशी केली. हा शब्द स्थानिकांना अधिक स्वीकारार्ह होता, कारण ते सिंधू नदीच्या आग्नेय दिशेला राहत होते. हे लोक राजकीयदृष्ट्या अत्यंत चतुर होते. त्यांनी स्थानिक लोकसंख्येला सामावून घेतले खरे, परंतु आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी एक श्रेणीबद्ध 'वर्णव्यवस्था' निर्माण केली. कालांतराने याच श्रेणीबद्ध वर्णव्यवस्थेतून जातिव्यवस्था जन्माला आली.

दुसऱ्या गटाचे नेतृत्व अफगाणिस्तान, उझबेकिस्तान आणि इतर भागांतून आलेल्या मध्ययुगीन आक्रमकांच्या (जे तुर्क-मंगोल वंशाचे होते) एका अतिसूक्ष्म अल्पसंख्याक वर्गाकडे होते. या गटानेही सत्तेचा वापर करून आणि विविध आमिषे दाखवून लोकसंख्येतील एका मोठ्या भागाला धर्मांतराच्या माध्यमातून स्वतःमध्ये सामावून घेतले. हे धर्मांतरीत लोक एकूण लोकसंख्येच्या जवळपास २० टक्के होते आणि त्यांना 'मुसलमान' (मुस्लिम) म्हणून ओळखले जाऊ लागले. तिसऱ्या गटात अशा स्थानिक लोकांचा समावेश होता, ज्यांनी हिंदू किंवा मुस्लिम या दोन्ही गटांमध्ये सामावून घेण्यास नकार दिला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक आणि सखोल संशोधनानुसार, हे लोक आता नामशेष झालेल्या बौद्ध धर्माचे अनुयायी होते. त्यांनी हिंदू व्यवस्थेत विलीन होण्यास नकार दिल्यामुळे, सत्ताधारी हिंदू वर्गाने त्यांच्यावर अनेक अमानुष अटी लादल्या. याचा परिणाम म्हणून त्यांना अत्यंत भीषण वंचना झाली. त्यांची अवस्था प्राणी किंवा गुलामांपेक्षाही वाईट झाली. त्यांना संपत्ती, शिक्षण किंवा मूलभूत मानवी हक्क मिळवण्यापासून वंचित ठेवण्यात आले, जेणेकरून ते कायमचे गुलाम राहतील. त्यांना केवळ एका वस्तू किंवा जनावरासारखे (chattel) वागवले गेले. पहिल्या जनगणनेत त्यांची लोकसंख्या अंदाजे ५ कोटी म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या सुमारे २०टक्के होती. त्यांना 'अस्पृश्य' म्हटले गेले. त्या काळात त्यांना कधीही ‘अनुसूचित जाती’ म्हटले गेले नाही. या गटाची ओळख निश्चित करण्यासाठी एकूण नऊ निकष निश्चित करण्यात आले होते. संपूर्ण हिंदू समाज चार वर्णांमध्ये विभागलेला होता, ज्यातून पुढे जाती विकसित झाल्या. हा २० टक्के लोकसंख्या असलेला घटक, ज्यांची स्थिती गुलामांसारखी होती, ते हिंदू समाजाचा भाग नव्हते. ते वर्णव्यवस्थेच्या पूर्णपणे बाहेर होते आणि त्यांना 'अवर्ण' म्हटले गेले. त्यामुळे सामाजिक-धार्मिक दृष्टीने त्यांचे जातींमध्ये विभाजन होण्याचा प्रश्नच नव्हता. जी वर्णव्यवस्था जातिव्यवस्थेचा पाया आहे त्या वर्णव्यवस्थेचा ते कधीही भाग नव्हते. या अस्पृश्य समजल्या गेलेल्या वर्गाची दखल ब्रिटिश राजवट येईपर्यंत कोणीही घेतली नव्हती. गांधीजींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने या वर्गाचे अस्तित्व मान्य करण्यास नकार दिला होता. जेव्हा गांधीजींनी स्वतःला भारतीय जनतेचे प्रतिनिधी म्हणून घोषित केले आणि सर्व भारतीयांच्या वतीने बोलण्याचा अधिकार असल्याचा दावा केला, तेव्हा त्यांनी हिंदू, मुस्लिम आणि शिखांचा उल्लेख केला, परंतु अस्पृश्यांचा उल्लेख केला नाही. कदाचित, त्यांच्या दृष्टीने ते मानवी जीव नसून केवळ जनावरांसारखे होते. परंतु, जेव्हा इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि फ्रेंच राज्यक्रांतीच्या गाढ ज्ञानाने समृद्ध असलेले प्रकांड विद्वान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला, तेव्हा त्यांनी प्रचलित धारणा बदलण्यास सर्वानाच भाग पाडले. अस्पृश्य हे भारतीय समाजजीवनात एक स्वतंत्र अस्तित्व असलेला उपेक्षित मानवसमुह आहे हे त्यांनी जगाला दाखवून दिले. त्यांच्या विद्वत्तेने, अमोघ वक्तृत्वाने आणि अकाट्य युक्तिवादाने भारताच्या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेत अस्पृश्यांसाठी हक्काचे दखलपात्र स्थान निर्माण केले. यातूनच ब्रिटिशांनी सन १९३२ चा जातीय निवाडा जाहिर करून भविष्यातील शासन-प्रशासनात त्यांचा सहभाग निश्चित केला. जो समूह तोपर्यंत उपेक्षित होता, ज्यांची दखल घेण्यास सवर्ण हिंदू आणि काँग्रेस पक्षाने नकार दिला होता, त्या शेवटी मान्य करावेच लागले की अस्पृश्य वर्गसुद्धा या देशातील साधन संपतीचा आणि शासन प्रशासनातील वाट्याचा हक्कदार आहे. स्वतःला सनातनी म्हणवून घेणारे गांधीजी अस्पृश्यांना शासन-प्रशासनात सहभागी करून घेण्यास पात्र असलेले मानवी जीव म्हणून स्वीकारण्याच्या मानसिकतेत मुळीच नव्हते. त्यांना अस्पृश्यांना कायमचे गुलाम म्हणूनच ठेवायचे होते. यामुळेच त्यांनी अस्पृश्यांचे राजकीय स्वातंत्र्य नाकारण्यासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली होती, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी असेही जाहीर केले होते की, अस्पृश्य आपली गुलामी सोडवण्यासाठी इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारू शकतात, परंतु त्यांना शासन-प्रशासनात सहभाग देण्यास मात्र ते मुळीच तयार नव्हते. यातूनच पुण्यातील (येरवडा जेलमधील) गांधीजींचे उपोषण नाट्य घडले. गांधीनी केलेल्या या कोंडीमुळे डॉ. आंबेडकरांसमोर मोठा पेच निर्माण झाला होता. त्यांना गांधीजींचे प्राणही वाचवायचे होते आणि त्याचवेळी ज्यांना ते 'शोषित वर्ग' (Depressed Classes) म्हणत होते, त्या अस्पृश्यांचे स्वातंत्र्यही सुरक्षित करायचे होते. गांधीजींनी त्यांचा उल्लेख 'हरिजन' (हा शब्द ऐतिहासिकदृष्ट्या अनौरस संततीसाठी वापरला जात असे) या अपमानास्पद शब्दाने केला, तर ब्रिटिशांनी त्यांना 'अस्पृश्य' म्हटले. या १२० वर्षांच्या इतिहासात त्यांचा उल्लेख कधीही ‘अनुसूचित जाती’ असा केला गेला नव्हता.

**उत्तम खोबरागडे IAS**
भारतीय प्रशासन सेवेतील निवृत्त प्रधान सचिव

क्रमशः ■ ■

# बुद्धगया येथील दुर्लक्षित खरे ऐतिहासिक मुचलिंद तलाव

## (बुद्धगया विशेष अभ्यास दौरा-भाग-1)

अखिल विश्वातील बौद्धांचे परमपवित्र श्रद्धास्थान व तिर्थक्षेत्र असलेल्या बुद्धगया येथील महाबोधी महाविहार परिसरातील मुचलिंद तलाव जगातील असंख्य बौद्धांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. हे ठिकाण महाबोधी महाविहाराच्या दक्षिणेला एका मौर्ययुगीन गोलाकार पाषाण स्तंभाच्या बाजुला आहे. संपुर्ण बौद्ध इतिहासात व विशेषतः शाक्यमुनी बुद्धांच्या जीवनात बुद्धत्व प्राप्ती व धम्मचक्र प्रवर्तन या दरम्यानच्या काळात घडलेल्या ज्या प्रमुख ऐतिहासिक घटना व स्थळांचा समावेश होतो त्यामध्ये मुचलिंद तलाव या स्थळाचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. परंतु आश्चर्यजनक बाब म्हणजे ही की महाबोधी महाविहार परिसरात असलेले सदरील मुचलिंद तलाव हे खरे ऐतिहासिक तलाव नसून वास्तविक मुचलिंद तलाव हे दुसरीकडेच कुठेतरी आहे.



महाबोधी महाविहार परिसर व आजुबाजुच्या परिसरात बुद्धांशी संबंधीत जी काही प्रमुख स्थळे आहेत त्यात गयाशीर्ष पर्वतावरील प्रागबोधी, सुजाता स्तूप, सुजाता खिरदान स्थळ, बोधिवृक्ष परिसर व मुचलिंद तलाव इत्यादी स्थळांचा समावेश होतो. यापैकी प्रागबोधी म्हणजे श्रमण सिद्धार्थ गौतमानी गयाशीर्ष पर्वतावरील ज्या गुफेमध्ये अतिशय कठीण तपश्चर्या केली ते ठिकाण. या ठिकाणी सिद्धार्थानी क्रमशः अन्नत्याग केला होता. परंतु सदरील प्रकारात त्यांना अपेक्षित लाभ न मिळाल्यामुळे व उलट त्यांची शारीरिक प्रकृती कमालीची खालावल्यामुळे श्रमण गौतमानी सदरील तपश्चर्येचा मार्ग सोडून दिला व पुढील मार्ग शोधण्यासाठी निरंजना नदीकडे निघून गेले. हल्ली प्रागबोधी या स्थळास ‘डुंगेश्वरी’ या नावाने ओळखल्या जाते.

सुजाता नावाच्या एका महिलेने ज्या ठिकाणी बोधिसत्व सिद्धार्थाला खीर दान केले त्या ठिकाणास सुजाताची खीर या नावाने ओळखले जाते तर तिच्या निवासस्थानाच्या ठिकाणी पाल राजघराण्याच्या काळात एका स्तूपाची निर्मिती करण्यात आली होती ते ठिकाण सुजाताचे घर किंवा सुजाता कोठी असे म्हटल्या जाते. ही तिन्ही ठिकाणे निरंजना नदीच्या पुर्व किणाऱ्यावरील पलिकडच्या परिसरात असून बुद्धत्व प्राप्तीपुर्वीच्या घटनांशी संबंधीत आहेत. मुचलिंद तलाव हे ठिकाण बुद्धत्व प्राप्तीनंतरच्या व धम्मचक्रप्रवर्तना दरम्यानच्या घटनेशी संबंधीत आहे.

**अश्ववीर गजभिये**
**मो. 9322502352**

प्राचीन बौद्ध साहित्य जसे ललीतविस्तर, खुद्दकनिकाय व दिघनिकाय यानुसार त्याचप्रमाणे पुरातत्वीय प्रमाणानुसार बुद्धत्वप्राप्तीनंतर सहाव्या आठवड्यात शाक्यमुनी बुद्ध मुचलिंद तलाव परिसरात ध्यानावस्थेत बसले असतांना विजांच्या कडकडांटासह मुसळधार पाऊसाला सुरूवात झाली होती. त्यामुळे बुद्धांच्या ध्यानसाधनेत व्यत्यय निर्माण झाल्याचे तेथील नागराजा मुचलिंद यांच्या लक्षात आले. त्यांनी मुसळधार पावसापासून बुद्धाचा बचाव करण्यासाठी लगेच उपाययोजना केली. त्यामुळे बुद्ध इतिहासात या घटनेचे व सदर स्थळाचे महत्व वाढून त्यास ऐतिहासिकत्व प्राप्त झाले. हे स्थळ महाबोधी महाविहाराच्या दक्षिणेकडे जवळपास एक किलोमिटर अंतरावर निरंजना नदीच्या अगदी पश्चिम किणाऱ्यावर स्थित आहे. वर्तमान महाबोधी महाविहाराच्या समोरिल बाजार परिसरातून दक्षिणेकडे जाणाऱ्या मार्गावर मुचारीन गावाशेजारी मुचलिंद तलाव आढळतो. या गावाचे नाव पूर्वी मुचलिंद असेच होते. परंतु कालौघात त्याचे अपभ्रंश होऊन आज त्यास ‘मुचारीन’ गाव असे नामाभिदान प्राप्त झाले. आज हे गाव बोधगया नगरपंचायत मधील एक वार्ड म्हणून गणले आहे. सदरील खरे ऐतिहासिक मुचलिंद तलाव हे ठिकाणी बिहार सरकारच्या पर्यटन व पुरातत्व विभागाद्वारे संरक्षित असले तरी बुद्धगयेला येणाऱ्या पर्यटकांना माहितच नाही. त्यामुळे हे ठिकाण अतिशय दुर्लक्षितावस्थेत असून त्याच्या ऐतिहासिकत्वाच्या महत्तेपासून वंचितच आहे.●●

# धम्मग्रंथ पठणापेक्षा धम्माचरण श्रेष्ठ

> तथागत
> भगवान बुद्ध श्रावस्ती येथील जेतवन विहारात विहरत असतांनाची ही गोष्ट आहे. श्रावस्ती नगरीत दोन तरुण राहत असत. ते एकमेकांचे परममित्र होते. भगवंताचे अनेक शिष्य त्यांच्या छायेखाली वावरून परमसुखाचा आनंद लुटताना त्या दोघांनी पाहिले होते, म्हणून त्यांनाही भिक्षु होण्याची इच्छा झाली व त्यांनी बुद्धांकडून एकाच वेळी दीक्षा ग्रहण केली. त्यापैकी एकाने भगवंताचा संपूर्ण उपदेश तोंडपाठ करून घेण्याचा निश्चय केला. संपूर्ण उपदेश पाठांतर असणे म्हणजे धम्म जाणणे अशी त्याची धारणा होती. त्याने संपूर्ण त्रिपीटक पाठ केले.

त्रिपटकधारी झाला व ठीक ठिकाणी जाऊन भगवंताचा उपदेश जशाचा तसाच लोकांना सांगू लागला व अनेक भिक्षुंचा तो गुरु म्हणवू लागला. मात्र हे करतांना त्याने ज्ञानमार्गाकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. दुसऱ्या मित्राने मात्र धम्म जाणून घेण्यासाठी गाथा पठणापेक्षाही ध्यान मार्गाचा अवलंब केला.

त्यांनी भगवंताच्या थोड्याशाच गाथाचे पठण करून खडतर ध्यान साधना केली व अर्हत पद प्राप्त केले. तो त्रिपिटकधारी जरी होऊ शकला नाही तरी ध्यान मार्गातील एक गुरु अर्थात विपश्यनाचार्य म्हणून गणला जाऊ लागला. त्याचा परिणाम म्हणून त्यालाही काही भिक्षु शिष्य म्हणून लाभले. दोघेही परममित्र आपापल्या मार्गात अत्यंत निष्णात झाले होते. त्यांच्या शिष्यांनाही त्या गुरुबद्दल आजार होता. काही दिवसानंतर श्रावस्ती येथे दोन्ही मित्रांची गाठ पडली. अर्हत प्राप्त मित्राला काही मोजक्याच गाथा पाठ असल्याचे त्रिपिटकधारी मित्राच्या लक्षात आले. त्याचा अहंकार जागा झाला. तो दुसऱ्याला नजरेने तुच्छ बघू लागला. तो मनात म्हणाला, ‘इतके दिवस भिक्षू राहून थोड्याशाच गाथा याला पाठ आहेत.’ त्यात त्रिपिटलकधारी भिक्षुने अर्हत भिक्षूचा अपमान करून आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा विचार मनात आणला. त्याच्या मनातील दुष्ट हेतू भगवंतांनी गंधकुटीत ध्यान करीत असता जाणला. ते फेरफटका मारण्याच्या उद्देशाने गंधकुटीच्या बाहेर पडले व दोघांकडे गेले. भगवंत त्यांच्यासाठी तयार केलेल्या आसनावर प्रतिष्ठित झाले. त्यांनी पहिल्या ज्ञानापासून ते आठव्याज्ञानापर्यंतची माहिती दोघांनाही आळीपाळीने विचारली. दोघांनीही त्याची उत्तरे बरोबर दिली. मात्र अर्हत पदाकडे नेणाऱ्या अवस्थांची माहिती त्रिपिटकधारी याला देता आली नाही. त्यावर तोच प्रश्न अर्हत असलेल्या भिक्षुला भगवंतांनी विचारला. त्यावर त्याने त्याचे योग्य उत्तर दिले. तेव्हा पृथ्वीवरील व ब्रह्मलोकांतील नाग व गरुडासहित सर्व देवांनी त्या अर्हत भिक्षुवर अभिनंदनचा वर्षाव केला. साधू! साधू! साधू! हर्षनांद संपूर्ण जेतवनात पसरला. हा अभिनंदनचा वर्षाव व तो साधुकाराचा हर्षध्वनी ऐकून त्रिपिटकधारी भिक्षुचे शिष्य व सहकारी दुखावले गेले व बुद्धांना म्हणाले की, त्यांनी असे का केले? ज्या भिक्षुला अगदी मोजक्याच गाथा माहित आहेत अशा भिक्षूची बुद्धांनी स्तुती केली. ब्रह्मलोकातील नागा व गरुडासहित अनेक देवतांनी साधु! साधु! साधु! चा हर्षध्वनी करून आनंद व्यक्त केला. परंतु आपले गुरु, ज्यांना त्रिपिटक संपूर्ण पाठ आहे आणि ज्याचे पाचशे शिष्य आहेत. अशा भिक्षुची जराही स्तुती केली नाही. त्यावर तथागत म्हणाले, ‘भिक्षुंनो, तुमच्या गुरूने माझा उपदेश पाठांतराने ग्रहण केला आहे. परंतु तुमच्या गुरुचा परममित्र असलेल्या भिक्षुने तो उपदेश प्रत्यक्ष अनुभवला आहे. तुमचा गुरु गुराख्यासारखा दुसऱ्याच्या गाई मोजतो. एखादा गुराखी 500 गायी राखतो तेव्हा 100 गाई राखणाऱ्या दुसऱ्या गुराख्याला तो अगदी तुच्छ समजतो. मात्र त्या पाचशे गाईपैकी एकही गाय त्याची स्वतःची नसते. तो 500 गायी राखणारा गुराखी एखाद्या एकच गाय राखणाऱ्या गाईच्या मालकालाही तुच्छ समजतो. परंतु तो याचा विचार करीत नाही की पाचशे गाई मी राखत असलो तरी त्या माझ्या स्वतःच्या मालकीच्या गाई नाहीत. त्याचा मालक दुसराच आहे. मात्र एक गाय चारणारा त्या गाईचा मालक असेल तर तो 500 गाई चारणाऱ्या गुराख्यापेक्षा केव्हाही श्रेष्ठ होय. कारण त्याच्या मालकीची ती एकच गाय त्याला दूध देते, दष्टपुष्ट करते. ‘भिक्षुंनो! जरी तुम्ही खूप गाथा उपदेश पठण केला असेल. परंतु प्रमादवस त्याप्रमाणे आचरण करीत नसाल तर त्या गाथा नुसत्या पाठांतर असण्याला काहीच अर्थ नाही, गाथा जाणणे, शास्त्र जाणने हे तर अगदी सरळ आहे. कारण त्या जाणण्याने अहंकाराला तृप्ती मिळते. मी जाणणारा झालो. मला सर्व शास्त्र पाठ आहेत. वेद पाठ आहेत दुसरे मात्र अज्ञानी आहेत. या जाणण्यानेच ऐट प्राप्त होते, अहंकार प्राप्त होतो. हा अहंकारच प्रमाद आहे.’ असे सांगून भगवंतांनी खालील गाथा म्हटल्या. आपण त्याचा अर्थ मराठीत समजून घेऊ. अर्थ :- एखाद्या व्यक्तीने धम्मग्रंथाचे अल्पपठण जरी केले आणि राग, द्वेष, मोह, विरहित राहून धम्माप्रमाणे आचरण केले. तसेच बुद्धिमान, अनासक्त व सतत जागृत राहून, ईहलोकांत आणि परलोकांतही कामवासनेपासून अलिप्त राहिला, तर अशी व्यक्ती श्रमणत्वाची भागीदार असते.



म्हणून पंडितामध्ये तुम्ही ऐट तर बघाल, परंतु अंतःकरणात निर्मलता दिसणार नाही व पंडित ठीकठिकाणी आपली स्तुती करतांना आढळेल. मात्र जो शास्त्र जाणतो आणि त्याप्रमाणे जगतो तर त्याचा अहंकार गळालेला आपणास आढळेल. सत्याच्या मार्गावर एक पाऊलही चालणारा झुकायला लागतो. नम्र होतो. शास्त्रात सत्य सापडत नाही. मात्र शास्त्र जाणणाऱ्याची ऐट, अहंकार वाढतच जातो. तथागतांनी गुराख्याचे फार सुंदर प्रतिक निवडलेले आहे. गुराखी गांवभरच्या गायी एकत्र करतो. जंगलात चारायला नेतो. दिवसभर त्या गाई चारतो. त्यांची मोजदाद बरोबर ठेवतो. त्यांना संध्याकाळी गांवात घेऊन येतो आणि लोकांना सांगतो, ‘बघा मी पाचशे गाई चारून आणल्या.’ परंतु त्या पांचशे गाईत त्याची एकही गाय स्वतःची नसते. सर्व गायी दुसऱ्यांच्या. भगवंताचा उपदेश,परंतु त्या दुसऱ्यांच्याच गाई. उपनिषद कितीही सुंदर तरी त्या दुसऱ्याच्याच गाई. तुमच्या स्वतःच्या किती गाई आहेत? की जीवनभर गुराखीच राहणार? गाईचे मालक तुम्ही कधी होणार? शब्द पाठांतराने माणूस गुराखीच राहणार आणि गाई किती असू द्यात, त्या सर्व दुसऱ्याच्याच आपली त्यात एकही नाही. मात्र गुराख्याची ऐट फार भारी असते, म्हणून बुद्ध म्हणतात, दुसऱ्याच्या गाई मोजणाऱ्या गुराख्यासारखा तो श्रमाण्याचा अधिकारी होऊ शकत नाही. जो नुसत्या खूप संहिता किंवा गाथा पाठ करतो. तो स्वतःला ब्राह्मण म्हणून मिरवण्याने काय होणार आहे? त्याला बुद्ध श्रमण म्हणत नाही. ब्राह्मण आणि श्रमण यांत एवढाच फरक आहे की, जो जाणण्यात आणि जगण्यात आहे. आपण कितीही ब्रह्मचर्या केली किंवा कितीही धम्मचर्य केली आणि त्या धम्माचा थोडाही स्वाद आपण अनुभवला नसेल, थोडीही धम्माच्या प्रकाशाची किरणे आपल्यात उतरत नसतील तर आपण धम्म समजूच शकणार नाही. आपण फक्त ऐकणार, मात्र विश्वास बसूच शकणार नाही. विश्वास त्यावेळी बसेल, ज्यावेळी धम्म आपला अनुभव बनेल, आपण तर्क करू, परंतु तर्काने धम्माजी तहान भागणार नाही.

म्हणून बुद्ध म्हणतात, ‘थोडीशीच संहिता कंठस्त असेल, परंतु धम्माचे जीवन असेल, जागृततेतील जीवन असेल, आनंदपूर्ण जीवन असेल, उत्सवपूर्ण जीवन असेल, प्रमोदित जीवन असेल, राग, द्वेष, मोहापासून मुक्त जीवन असेल तर आपण श्रमनत्वाचे आवश्य भागीदार आहोत. आमची एवढीही असती नसावी, वासना, मोक्ष निर्वाण किंवा ज्ञान मिळवण्याचीही को असेना, कारण वासनेचा स्वभाव आहे की, आपल्याला जीवनापासून वंचित करणे, निर्वासनेत जगणे म्हणजे धम्म होय. जो अस्तित्वात आहे त्यातच विलीन होणे, जे आता आणि इथे आहे त्यातच ताळमेळ बसवणे, त्याबरोबर स्वरबद्ध होणे, छंदबद्ध होणे म्हणजे धम्म, वर्तमान क्षणात डुंबून जाणे हाच धम्म, ज्यावेळी वर्तमान क्षणात आपण डुबून जाऊ, निर्वाण आमच्यात निर्माण होईल, तो सदा सर्वदा आपल आपल्यात विलीन होता, फक्त आम्ही ठिकाणावर हजर नव्हतो, सुख काही भौतिक जागा नाही जिथे पुण्यवानांची वस्ती आहे. आपले जीवन होशपूर्ण असेल, जागृत असेल तर वेद जाणण्याची गरज नाही, शस्त्रज्ञाची गरज नाही. अशावेळी आपण जे बोलू तेच वेद होईल, जे बोलु तेच शास्त्र होईल, आपल्यातूनच शास्त्र निर्मित होईल, आपल्या बसण्या उठण्यात वेद आणि शास्त्राची चमक दिसायला लागेल, कारण आपण बुद्धत्वाचे बीज घेऊनच जन्माला आलो आहोत, त्या बुद्धत्वासाठी आम्ही विशिष्ट भूमी तयार केली पाहिजे. योग्य औषध दिले पाहिजे. बीज जर बीजत राहिले, त्यापासून झाड व झाडातून फुल, फळ निर्मित झालेच नाही तर बिजाचा काय उपयोग? बीज अंकुरितच होत नसेल तर बीजाचा काय फायदा? प्राप्त झालेले बीज सजवण्यात काय अर्थ? आणि या बुद्धत्वाचे बीज आम्ही स्वतःच कुजवले तर आम्ही दुसऱ्याला जबाबदार धरू नये. आपल्या शिवाय दुसरा कोणी त्याला अंकुरित करू शकणार नाही. आम्हीच त्याला नष्ट करू शकतो किंवा आम्हीच त्याला अंकुरित करू शकतो. आम्ही दुःख प्राप्त करू शकतो. आम्हीच सुख पण. कल्याण, शुभ आनंद करू शकतो. असे बुद्ध म्हणतात.●●

**तथागताची सत्यगाथा**



**देविदास राऊत**
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

# मागास वर्गीय आरक्षणाचे उपवर्गीकरण की जात अस्मितेचे वर्गीकरण?



मागासवर्गीय आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना अधिकार दिल्यानंतर महाराष्ट्रात व्यापक चर्चा सुरू झाली आहे. हा विषय केवळ न्यायालयीन किंवा प्रशासकीय राहिलेला नाही, तर तो सामाजिक आणि राजकीय पातळीवर जातीय अस्मितांशी जोडला गेला आहे. त्यामुळे मागास समाजातील विविध घटक पुन्हा एकदा परस्परविरोधी गटांमध्ये विभागले जात असल्याचे चित्र दिसत आहे. भारतीय समाजव्यवस्थेत केवळ आर्थिक हितसंबंधांवर वर्ग निर्मिती होत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले होते की भारतातील श्रमिक वर्गही जातींमध्ये विभागलेला आहे. म्हणूनच भारतात केवळ वर्गसंघर्ष पुरेसा ठरत नाही; सामाजिक परिवर्तनासाठी जातव्यवस्थेचे उच्चाटन आवश्यक आहे. जातीव्यवस्था ही जन्मावर आधारित, बंदिस्त आणि श्रेणीबद्ध व्यवस्था असल्यामुळे प्रत्येक जात स्वतःच्या मर्यादित हितालाच प्राधान्य देते. समान शोषण सहन करणारे समाजघटकही अनेकदा एकमेकांविरुद्ध उभे राहतात. डॉ. आंबेडकरांनी हिंदू समाजाची तुलना विविध कप्प्यांनी बनलेल्या इमारतीशी केली होती. प्रत्येक जात स्वतंत्र, स्वकेंद्रित आणि इतरांपासून तुटलेली आहे. त्यामुळे आपल्या जातीचा नेता, आपले महापुरुष आणि आपली अस्मिता यांनाच सर्वोच्च मान देण्याची मानसिकता तयार झाली. परिणामी सामाजिक ऐक्य निर्माण होण्याऐवजी विभाजन अधिक दृढ झाले.



**ॲड. अविनाश टी. काले**
**मो. 9960178273**

महाराष्ट्रात महार आणि मातंग हे दोन्ही समाज शतकानुशतके अस्पृश्यतेचे आणि सामाजिक अन्यायाचे बळी राहिले. बलुतेदारी व्यवस्थेमुळे त्यांच्यावर अपमानास्पद कामे लादली गेली. मृत जनावरांची विल्हेवाट लावणे, सामाजिक बहिष्कार आणि मानवी प्रतिष्ठेचा अभाव हे दोन्ही समाजांचे समान वास्तव होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे या अमानवी प्रथांविरुद्ध स्वाभिमानाची लढाई उभी राहिली आणि वंचित समाजात नवचैतन्य निर्माण झाले. इतिहासात महार आणि मातंग समाजामध्ये काही संघर्ष झाले असले, तरी त्याचे मूळ या समाजांत नसून जातव्यवस्थेने निर्माण केलेल्या विषमतेत आहे. १९४१ मध्ये देविदासराव कांबळे यांनी डॉ. आंबेडकरांना लिहिलेल्या पत्राला उत्तर देताना त्यांनी मातंग समाजाने महार समाजापासून दुरावा ठेवून सनातनी शक्तींच्या प्रभावाखाली जाऊ नये, असा स्पष्ट इशारा दिला होता. त्यांचा उद्देश सर्व शोषित समाजांनी एकत्र येऊन समान हक्कांसाठी संघर्ष करावा हा होता. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनीही आपल्या साहित्याद्वारे जात आणि वर्ग या दोन्ही प्रकारच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या लेखनातील ‘जग बदल घालुनी घाव’ हा संदेश सर्व वंचित समाजाच्या ऐक्यासाठी होता. त्यामुळे महार, मातंग किंवा इतर कोणताही मागास समाज असो, ते सर्व अन्यायकारक व्यवस्थेचे बळी आहेत, ही जाणीव कायम ठेवणे आवश्यक आहे. आज आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या चर्चेमुळे मागास समाजात परस्पर संशय आणि संघर्ष वाढताना दिसतो. मात्र याच काळात शिक्षणाचे वाढते खाजगीकरण, प्रचंड शुल्क, शासकीय शाळांचे बंद होणे, करार पद्धतीची नोकरभरती, सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण आणि सरकारी नोकऱ्यांतील घट या अधिक गंभीर समस्या आहेत. आरक्षणाचा लाभ मिळविण्याच्या संधीच कमी होत असतील, तर समाजाने केवळ अंतर्गत वादात अडकून राहणे योग्य ठरणार नाही. याशिवाय नागरिकत्व, मतदार यादी आणि ओळखपत्रांबाबतही अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. भटके-विमुक्त, आदिवासी आणि इतर मागास समाजातील अनेकांकडे जुन्या महसुली किंवा जन्मनोंदीचे पुरावे उपलब्ध नाहीत. अशा परिस्थितीत त्यांच्या घटनात्मक अधिकारांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून समाजाला जातीय संघर्षात अडकविणे कोणाच्याच हिताचे नाही. आजची खरी गरज म्हणजे शिक्षण, रोजगार, सामाजिक न्याय आणि घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी सर्व मागास समाजांनी एकत्र येणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा संदेश हा आजही तितकाच महत्त्वाचा आहे. आरक्षणाचे उपवर्गीकरण हा कायदेशीर आणि धोरणात्मक विषय असू शकतो; परंतु त्याचे रूपांतर जातीय अस्मितांच्या संघर्षात होऊ नये. कारण समाज विभागला गेला तर त्याचा लाभ नेहमीच विषमता टिकवून ठेवणाऱ्या शक्तींनाच होतो. म्हणूनच आज आवश्यक आहे ती परस्पर वैमनस्याची नव्हे, तर सामाजिक ऐक्याची भूमिका. आरक्षण, शिक्षण, रोजगार आणि घटनात्मक हक्क यांचे संरक्षण हेच सर्व वंचित समाजांचे समान ध्येय असले पाहिजे. जातीच्या नावाने विभागले जाण्यापेक्षा सामाजिक न्यायाच्या मूल्यांभोवती एकत्र येणे, हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना खरी अभिवादन ठरेल.●●

“ अहंकार हा माणसाच्या प्रगतीचा सर्वात मोठा शत्रू आहे... ”



# अयोध्या राम मंदिरातील दानपेटी रक्कम चोरी का शक्य झाली?

अयोध्येतील राम मंदिर दानपेटी मधील चोरी संबंधी आणि घोटाळ्यासंबंधी बातम्या प्रसिद्ध झाल्या. आणि संपूर्ण देश हादरला. कारण श्रीराम प्रभू विषयी सर्वसामान्य जनतेच्या मनात जी प्रेमाची, श्रद्धेची भावना आहे. त्यावर या घटनेमुळे जबरदस्त आघात झाला. ज्या प्रभू रामचंद्राचे मंदिर बनण्यासाठी एवढे मोठे आंदोलन या देशामध्ये झाले. मोठ्या प्रमाणावर यामध्ये लोक सहभागी झाले. मंदिरासाठी सोन्याच्या चांदीच्या विटा दान केल्या, मंदिर बांधणीसाठी मोठ्या प्रमाणावर दानात रक्कम जमा केली. त्याचा राजकीय परिणाम म्हणून एक विशिष्ट विचारसरणीचे आर. एस. एस. चे, भाजपचे लोक केंद्रातही सत्तास्थानी आले. अशा पवित्र राम मंदिराच्या दानपेटीतील चोरी कोणी कशी काय करू शकतो? असा प्रश्न सर्वसामान्य श्रद्धाळू माणसाला पडतो. कारण किमान देवासोबत तरी कुणी खोटेपणा करण्याचे, देवाला फसवण्याचे, धाडस करणार नाही, धाडस करू शकत नाही, अशी सर्वसामान्य माणसाची श्रद्धा असते आणि म्हणूनच राम मंदिर दानपेटीतील चोरी संबंधी जेव्हा तो ऐकतो किंवा राम जन्मभूमीच्यासाठी विकत घेतलेल्या जमिनीमध्ये कोट्यावधींचे घोटाळे झाले या बातम्या त्याच्यापर्यंत पोहोचतात, त्यावेळेस तो प्रचंड अस्वस्थ होतो. ही सर्वसामान्य माणसाची, नितांत श्रद्धा असणाऱ्या माणसाची भावना आहे. पण मंदिराच्या दानपेटीतली चोरी असो अथवा मंदिरातल्या दागिन्यांची चोरी असो अथवा मंदिर मज्जिद चर्च यांच्या व्यवस्थापनातला भ्रष्टाचार असो, हा काही अपवाद नाही. अथवा त्याचे अप्रूप वाटावे असे काहीही नाही. असे सातत्याने, वारंवार या देशात आणि जगभरात घडत आले आहे.अयोध्येतील राम मंदिर दानपेटी चोरी संबंधी एसआयटी गठीत करण्यात आली आहे. तिचा रिपोर्ट सांगतो 40 दिवसांमध्ये 70 वेळा चोरी झाली. सीसी टीव्हीमुळे तसे पुरावे समोर आले आहेत. एसआयटीच्या म्हणण्याप्रमाणे 80 लाख रुपयांची चोरी झाली आहे. सोशल मीडिया वरच्या आणि इतर बातम्या अंदाज व्यक्त करतात की हा घोटाळा 1000 कोटी पेक्षा अधिक रुपयांचा आहे. किंवा दोन कोटी रुपयांची जमीन विकत घेऊन काही तासातच ती 18.5 कोटींना विकली गेली. या एवढ्या मोठ्या भ्रष्टाचाराबद्दल राम जन्मभूमीचे सर्वेसर्वा चंपत राय म्हणतात की यात घोटाळा नाही. आजच्या बाजारभावाने ही किंमत दिली गेली आहे. पण काही तासांपूर्वीच दोन कोटीला विकत घेतलेली जमीन 18.5 कोटी मध्ये आपण विकत घेतो. यात त्यांना भ्रष्टाचार वाटत नाही. एवढे ते निर्ढावलेले आहेत. एसआयटी ने एफ.आय.आर. दाखल करून आठ लोकांना अटक केली आहे. तरीपण संबंधित चंपत राय सारखे मोठे, ट्रस्टवर संपूर्ण कंट्रोल असलेले लोक या घोटाळ्याशी आपण संबंधित नाही असेच सांगत आहेत. याआधी महाकाली टेम्पल, पवनगड येथील गर्भगृहातून 2024 मध्ये 78 लाख रुपयांच्या दागिन्यांची चोरी झाली. तारातारीनी मंदिरात 2024 साली दहा लाख रुपयांचे दागिने मूर्तीवरून चोरून नेले. कंकालीता मंदिर 2010 मध्ये लाखो रुपयांचे दागिने चोरीला गेले. या चोरीच्या घटना वारंवार घडत होत्या. कोदंडा रामस्वामी मंदिरामध्ये 2009 मध्ये मंदिराच्या पुजाऱ्याने दहा लाख रुपयांचे दागिने गहाण ठेवले होते. त्याच्या आर्थिक अडचणींमुळे ही चोरी केलीअसे त्यांने सांगितले होते. सबरीमाला मंदिरात १९२५-२६ साली दुरुस्तीच्या कामावेळी सोन्याचा मोठ्या प्रमाणावर अपहार झाला. त्यामुळे एसआयटी गठीत झाली. या चोरीमध्ये मंदिर संबंधित अधिकाऱ्यांचा आणि सोनारांचा संबंध होता असे पुढे सिद्ध झाले. श्री पद्मनाभस्वामी मंदिरात 2026 मध्ये जेवढे नाणी आणि सोने जमा झाले होते ते त्या प्रमाणात उपलब्ध नव्हते. म्हणजे चोरी झाली होती असा अंदाज व्यक्त करण्यात आला. अशी उदाहरणे अनेक मंदिरांबाबत पाहायला मिळतात. काही वेळेस बाहेरचे चोर येऊन चोरी करतात. पण त्यामध्ये अनेकदा स्थानिक पुजारी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभागी असतात, असे पुरावे वारंवार समोर आले आहेत. रात्रंदिवस देवाच्या सानिध्यात असणारे हे पुजारी, पंडे देवाच्याच दागिन्यांची वा देणगीची चोरी करण्याची हिम्मत कशी करतात? किंवा चोरी करणारे चोर देवाची संपत्ती चोरण्याची हिंमत का करतात? अशी हिम्मत ते कसे करू शकतात? या प्रश्नांची उत्तरे आपण शोधली पाहिजेत. धार्मिक आणि श्रद्धाळू माणसांनाच नव्हे तर सर्वसामान्य माणसांना सुद्धा इतर भ्रष्टाचारापेक्षा मंदिरामध्ये झालेला भ्रष्टाचार हा अधिक गंभीर वाटतो. त्यामुळे ते जास्त अस्वस्थ होतात. याचे कारण काय? माणूस कोणत्याही धर्मामध्ये जन्मलेला असो. सर्वसामान्य माणसांवर एक सामान्य संस्कार झाला असतो. देवाचे सर्वांवर बारीक लक्ष असते. 'उसके मर्जी के बगैर पेड का पत्ता भी खड़कता नही'. त्याच्यापासून काहीही लपवता येत नाही. त्याला सगळे आपोआप कळते. हा एक संस्कार प्रत्येक धार्मिक माणसावर खोलवर झाला असतो. त्याच्या श्रद्धा प्रक्रियेचा तो अविभाज्य भाग असतो आणि सगळ्या प्रामाणिक, चांगल्या गोष्टींचा संबंध तो देवाशी जोडतो. देवाला मानणारा माणूस प्रामाणिकपणेच वागेल, खोटेपणा करणार नाही, चोरी करणार नाही, गुन्हेगारी करणार नाही अशी सर्वसामान्य माणसाची समजूत असते. कारण देव मानणाऱ्या माणसाला आपण जे काही करतो ते देवाला कळते, हे माहीत असते आणि त्यामुळे तो असली कृत्य करण्यासाठी धजावत नाही. असाही सर्वमान्य समज असतो. जर देव आणि धर्मावरच्या लोकांचा विश्वास उडाला तर समाजामध्ये गुन्हेगारी वाढेल, अप्रामाणिकपणा वाढेल, एक दुसऱ्याचा सर्रास खून करतील, माणसे माणसासारखी वागणार नाहीत, जनावरासारखी वागतील. अशी समजूत लहानपणापासून सर्वसामान्य माणसांवर झालेल्या धार्मिक संस्कारांमधून निर्माण झाली असते. पण ती सत्य आहे काय? याचा आपण मागोवा घेऊ या. एकेकाळी माझीही अशीच ठाम समजूत होती, श्रद्धा होती.




1975 साली जून महिन्यात 25 तारखेला आणीबाणी लागली. त्यावेळी आणीबाणीला विरोध केला म्हणून मी जेलमध्ये नऊ-दहा महिन्यांसाठी होतो. आणीबाणीला विरोध करून आलेले आम्ही तीन विद्यार्थी मी, चंद्रकांत वानखेडे, सुभाष इथापे वगळता बाकीचे सगळे हिस्टरी शीटर होते. म्हणजे सारेच्या सारे गुन्हेगार म्हणून सिद्ध झालेले लोक वर्ध्याच्या जेलमध्ये कोंबले होते. 800-900 तरी असे कैदी सोबत असावेत. ते सारेच्या सारे देव मानत होते. रोज आपापल्या श्रद्धेनुसार, धर्मानुसार पूजा करत होते. कैद्यांच्या बॅरॅकमध्ये दारांच्या लोखंडी बार्सवर देवांच्या तसबिरी लटकल्या होत्या. प्रत्येकाच्या देवाची तसबीर स्वतंत्र. त्याची स्वतंत्रपणे पूजा चालायची. केवळ आम्ही तीन विद्यार्थी त्या काळात देवपूजा करत नसू. पुढे त्या हिस्ट्री शिटर सहकैद्यांशी अतिशय चांगली मैत्री झाली. त्यांच्याशी संवाद सुरू झाला आणि मग तीव्रतेने लक्षात आले की प्रत्येकाचा देव, अल्ला, गॉड त्याच्या अनैतिक कामांमध्ये, चोरीमध्ये, खिसे कापण्यामध्ये, दरोडा घालण्यामध्ये, खुनामध्ये त्याला मदत करतो अशी त्याची श्रद्धा असते, खात्री असते. एक अत्यंत कुप्रसिद्ध, मुस्लिम गुंड मनुष्य आमच्या जेलमध्ये होता. त्याला सगळे लोक प्रचंड घाबरत असत. आम्ही राजकीय कैदी असल्यामुळे इतर सारे कैदी आमचा आदर करत असत. त्या गुंडाशी पुढे माझी मैत्री झाली. त्यावेळी त्याने मला सांगितले. आजपर्यंत त्याने अनेक खून केले पण तो कधीही पकडला गेला नव्हता. यावेळेस तो का पकडला गेला? कारण? त्याने त्याचा नेहमीचा एक नियम मोडला. पुलगावच्या जागृत हनुमानाच्या मंदिरामध्ये दर आठवड्याला विशिष्ट दिवशी तो शेंदूर चढवत असे. म्हणजे शेंदूर फासत असे मारुतीच्या मूर्तीला. पोलिसांमध्ये असलेल्या त्याच्या स्त्रोताद्वारा 'त्याला अटक करण्याचा आदेश निघाला आहे' असे त्याला कळले आणि त्या विशिष्ट वारी तो त्या मंदिरात येतोच येतो, हे पोलिसांना माहीत होते आणि म्हणून पोलीस त्या दिवशी अटक करतील अशी सुचना मिळाली होती. म्हणून तो त्या दिवशी हनुमानजीला शेंदूर चढवायला गेला नाही आणि तिसऱ्याच दिवशी त्याला अटक झाली. ‸याची गाढ श्रद्धा होती की त्याने दर आठवड्याला मंदिरात जाण्याचा नियम तोडला, शेंदूर चढवला नाही, म्हणूनच मारुतीने त्याचे संरक्षण केले नाही, त्यामुळे त्याला पोलीस अटक करू शकले. मुस्लिम असूनही त्याची ही मारुतीवरची प्रगाढ श्रद्धा होती. प्रत्येक गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या माणसाची अशा प्रकारची श्रद्धा असते. तो देवाला साकडे घालूनच आपले गुन्हेगारी कृत्य करायला पुढे जातो आणि त्यामध्ये त्याला यश मिळाले तर त्याचे सारे श्रेय तो देवाला देतो. किंवा आपण देवाची विशिष्ट पूजा केली त्याला देतो. हे मी जेव्हा प्रत्यक्ष या लोकांच्या तोंडून ऐकले, अनुभवले त्यावेळेस आजपर्यंतचा माझ्यावर झालेला संस्कार अंतर बाह्य हादरून गेला होता. कारण सगळ्याच 'चांगल्या गोष्टींचे प्रामाणिकपणाचे, उत्तम गुणांचे प्रतिक म्हणजे देव.' या पद्धतीच्या संस्काराला प्रचंड छेद देणारी ही गोष्ट होती. ज्या काळामध्ये मी बुद्धी प्रामाण्यवादी नव्हतो त्याही काळात मी आवर्जून अनेक मंदिरांमध्ये जायचो आणि विवेकवादी झाल्यावरही मी भारतातल्या सगळ्याच धार्मिक स्थळांना मुद्दाम वेळात वेळ काढून भेटी देत असतो. कोणत्याही सर्वसामान्य धार्मिक, श्रद्धाळू माणसांपेक्षा मी देशभरातल्या अधिक धार्मिक स्थळांवर गेलो आहे. त्या ठिकाणी थांबून अतिशय सूक्ष्म अवलोकन करत असतो आणि या सगळ्या अनुभवांच्या आधारावर मला ठामपणे आज सांगता येते की मंदिरातल्या पुजाऱ्यांचा, त्या ठिकाणी वावरणाऱ्या पंड्यांचा देवावर अजिबात विश्वास नसतो. या जगात देव नाही याची त्यांना शंभर टक्के खात्री असते आणि म्हणूनच देवापुढे उभे राहून, देवाच्या साक्षीने, ते धादांत खोटे बोलत असतात, श्रद्धाळू माणसांना लुबाडत असतात, त्यांना 'असे केले नाही तर' त्यांचे वाईट होईल, आर्थिक नुकसान होईल, आपत्ती कोसळेल अशी भीती घालत असतात. अथवा पैशाच्या विशिष्ट महागड्या पूजेच्या मोबदल्यात आर्थिक फायद्याचे, स्वर्गाचे अथवा मोक्षाचे गाजर विकत असतात. या जगात देव आहे याची एक टक्का जरी त्यांना खात्री असती तरी देवाच्या नावावर, देवाच्या सानिध्यात, साक्षीने देवाच्या भक्तांना अशा पद्धतीने लुबाडण्याची त्यांची हिंमत झाली नसती. राहू केतूची, साडेसातीची, ग्रह गोलांच्या आपत्तीची भीती घालून तथाकथित मौल्यवान दगड, मुळात अत्यंत कमी किमतीचा असलेला, अत्यंत महागड्या किंमतीमध्ये 'राशी रत्न' म्हणून विकणारे, विशिष्ट महागडी पूजा घालून गंडांतरं टाळण्याचा दावा करणारे, सारे ज्योतिषी 100टक्के नास्तिक असतात. त्यांचा देवावर व ग्रहांच्या वक्रदृष्टीवर विश्वास नसतो. त्या सगळ्यांना नीट माहीत असते की आपण कितीही लोकांना लुबाडले, देवाच्या नावावर फसवले, तरी देव काही आपले बिघडवणार नाही. तो आपले काहीही नुकसान करू शकणार नाही. याची त्यांना शंभर टक्के खात्री असते. गेली 44 वर्ष अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नावाखाली मी या क्षेत्रामध्ये काम करतो आहे आणि त्या अनुभवाच्या आधारावर अतिशय ठामपणे मी म्हणू शकतो आहे की ज्योतिषी असोत, पंडित असोत, पुजारी असोत, स्वतःला दैवी शक्ती अर्पण करणारे बाबा असोत, अंगात देवाचा संचार करणारे स्त्री पुरुष असोत हे सारेच्या सारे या जगात देव नाहीत याची खात्री असणारे लोक असतात. तेव्हाच ते देवाच्या नावावर सर्वसामान्य लोकांचे शोषण करू शकतात. त्यांना फसवतात, लुबाडतात. 1983 साली फेब्रुवारी महिन्यात मी पहिल्यांदा गुजरातचा दौरा केला होता. एकूण 48 कार्यक्रमांचा तो दौरा होता. तामिळनाडूचे बी. प्रेमानंद चमत्कार करत असत आणि मी तीन तास हिंदीत भाषण देत असे. मला एका कार्यक्रमानंतर नेहमीप्रमाणे मोठमोठ्या माणसांना भेटवण्यात आले. त्यापैकी एक अतिशय मोठे व्यापारी होते.



श्याम मानव
अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती

क्रमशः ■ ■

# मराठी साहित्याला जागतिक पटलावर नेणारे बाबुराव बागूल




मराठी दलित साहित्याच्या इतिहासात बाबुराव बागूल हे अत्यंत प्रभावशाली आणि क्रांतिकारी लेखक म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे केवळ दलित समाजाचे वास्तव मांडले नाही, तर भारतीय साहित्याला नवी सामाजिक आणि वैचारिक दिशा दिली. त्यांच्या कथांनी मराठी साहित्याच्या पारंपरिक चौकटी मोडून सामाजिक विषमता, जातीय अन्याय, दारिद्र्य, शोषण आणि मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न जागतिक स्तरावर पोहोचवला. बाबुराव रामजी बागूल यांचा जन्म १९३० साली नाशिक येथे झाला. आर्थिक अडचणींमुळे त्यांनी विविध प्रकारची कामे करत जीवनाचा संघर्ष केला. या संघर्षातूनच त्यांची साहित्यदृष्टी घडली. १९६३ मध्ये प्रकाशित झालेला ‘जेव्हा मी जात चोरली’ हा त्यांचा पहिला कथासंग्रह मराठी साहित्यातील ऐतिहासिक घटना ठरला. दलितांच्या वेदना, अपमान आणि विद्रोहाचे इतके वास्तववादी चित्रण यापूर्वी मराठीत क्वचितच झाले होते. या पुस्तकामुळे दलित साहित्याला नवे वळण मिळाले आणि मराठी वाचकांना समाजातील कटू वास्तवाचा सामना करावा लागला. यानंतर ‘मरण स्वस्त होत आहे’ या कथासंग्रहातून त्यांनी सामाजिक अन्याय आणि मानवी अस्तित्वावरील प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले. त्यांच्या लेखनात कार्ल मार्क्स, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. समता, स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा ही त्यांच्या साहित्याची मूलभूत मूल्ये होती. १९७० मध्ये महाराष्ट्र शासनाने त्यांना हरिनारायण आपटे पुरस्काराने सन्मानित केले. १९६८ नंतर त्यांनी पूर्णवेळ साहित्यलेखनाला वाहून घेतले. १९७२ मध्ये दलित पँथर चळवळीच्या वैचारिक जडणघडणीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच वर्षी महाड येथे झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले. त्यांच्या साहित्याने पुढील पिढीतील अनेक दलित लेखकांना आत्मकथन, विद्रोह आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा दिली. त्यांच्या ‘आई’ या कथेत दलित स्त्रीच्या दुहेरी शोषणाचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण आढळते. ही कथा केवळ एका आईची नसून जात आणि लिंग या दोन्ही आधारांवर होणाऱ्या अन्यायाची सामाजिक नोंद आहे. कथेतील पांडूची आई ही विधवा असून तिच्यावर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी येते. जगण्यासाठी तिला घराबाहेर पडावे लागते; मात्र समाज तिच्या श्रमाचा सन्मान न करता तिच्या चारित्र्यावर संशय घेतो. त्यामुळे ती आर्थिक, सामाजिक आणि मानसिक अशा तिन्ही स्तरांवर छळ सहन करते. पांडूच्या वडिलांचे दारूचे व्यसन, घरगुती हिंसा आणि स्त्रीला केवळ पुरुषाची मालमत्ता समजणारी पितृसत्ताक मानसिकता लेखकाने प्रभावीपणे उभी केली आहे. स्त्रीच्या शरीरावर आणि आयुष्यावर पुरुषाचा हक्क असल्याची समाजमान्य कल्पना बागूल कठोरपणे उघड करतात. शाळेत पांडूच्या शिक्षिकेकडून आईचे आदर्श, त्यागमूर्ती आणि वात्सल्यसिंधू असे चित्र रंगवले जाते. परंतु प्रत्यक्षात उच्चवर्णीय मुले त्याच्या आईचा अपमान करतात. या विरोधाभासातून लेखक दाखवतात की समाजाने निर्माण केलेली मातृत्वाची आदर्श प्रतिमा सर्व स्त्रियांना समान न्याय देत नाही. दलित स्त्रीचे मातृत्व सतत संशयाच्या नजरेतून पाहिले जाते. बागूल यांच्या मते दलित स्त्रीवर होणारे अत्याचार हे केवळ लिंगभेदापुरते मर्यादित नसून जातीय सत्तासंबंधांशी जोडलेले आहेत. उच्चवर्णीय पुरुष दलित विधवांकडे सहज शोषण करता येणारी व्यक्ती म्हणून पाहतात. आर्थिक गरिबी, सामाजिक असुरक्षितता आणि जातीय अन्याय यांच्या विळख्यात अडकलेल्या स्त्रियांना न्याय मिळणे अत्यंत कठीण होते. म्हणूनच ‘आई’ ही कथा वैयक्तिक दुःखापलीकडे जाऊन संपूर्ण सामाजिक व्यवस्थेवर कठोर भाष्य करते. बागूल यांनी दलित मुलांवरील शालेय भेदभावाचाही प्रभावी वेध घेतला आहे. सततच्या अपमानामुळे त्यांच्या आत्मसन्मानावर आघात होतो. पांडूच्या अनुभवातून जातीय व्यवस्थेचे अमानवी स्वरूप आणि त्यातून निर्माण होणारी मानसिक जखम लेखक वाचकांसमोर उभी करतात. त्यांचे साहित्य केवळ वेदनेचे चित्रण करत नाही, तर परिवर्तनाची प्रेरणाही देते. त्यांनी साहित्याला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले. दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान, आंबेडकर भारत, आकार यांसारख्या त्यांच्या साहित्यकृतींनी सामाजिक विचारविश्व समृद्ध केले. २६ मार्च २००८ रोजी नाशिक येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने ‘बाबुराव बागूल गौरव पुरस्कार’ सुरू केला आहे. दरवर्षी उत्कृष्ट मराठी कथासंग्रहाला हा पुरस्कार प्रदान केला जातो. बाबुराव बागूल यांनी मराठी साहित्याला केवळ नवी अभिव्यक्ती दिली नाही, तर दलितांच्या वेदना, संघर्ष आणि स्वाभिमानाला जागतिक साहित्यविश्वात स्थान मिळवून दिले. त्यांच्या लेखणीतून सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेचा आवाज बुलंद झाला. म्हणूनच ते केवळ दलित साहित्याचे नव्हे, तर आधुनिक मराठी साहित्याचेही एक महान शिल्पकार मानले जातात. आजही त्यांचे साहित्य अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देत राहिले आहे आणि मराठी साहित्याला जागतिक ओळख मिळवून देणाऱ्या महान साहित्यिकांमध्ये त्यांचे स्थान अढळ आहे..●●

वर्तमान



विकास मेश्राम
मो. 7875592800

## पेराल ते उगवेल

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

समय रहते समझदार बनो! क्योंकि जवानी जो बोलती है, बुढ़ापे को वही काटना पड़ता है।” या काही ओळी आयुष्याचे गहन तत्त्वज्ञान सहजपणे सांगून जातात. तारुण्य हे उत्साहाचे, उमेदीचे आणि स्वप्नांचे वय असते; पण त्याचबरोबर ते निर्णय घेण्याचेही वय असते. या काळात अनेकदा आवेश, अहंकार आणि क्षणिक आनंद यांच्या प्रभावाखाली आपण शब्द बोलतो, कृती करतो आणि काही नात्यांनाही दुखावतो. त्यावेळी वाटते की वेळ नेहमीच आपल्याच बाजूने राहणार आहे. पण काळ पुढे सरकत जातो आणि एक दिवस वृद्धत्व दार ठोठावते. तेव्हा तरुणपणी बोललेले कठोर शब्द, केलेल्या चुका आणि दुर्लक्षित केलेली माणसे आठवू लागतात. माणसाचे तारुण्य हे जणू बी पेरण्याचा काळ असतो, तर वृद्धत्व हे त्या पेरलेल्या बियाचे पीक कापण्याचा काळ असतो. म्हणूनच तरुणपणी विवेक, संयम आणि नम्रता यांची साथ असेल, तर वृद्धत्व समाधानाचे आणि सन्मानाचं ठरते. पण जर अहंकार, उधळेपणा आणि अविचार यांची पेरणी केली, तर पश्चात्तापाची कापणी अटळ ठरते. शब्द हे बाणासारखे असतात. एकदा धनुष्यातून सुटले की ते परत येत नाहीत. म्हणून बोलण्यापूर्वी विचार करणे, निर्णय घेण्यापूर्वी परिणामांचा अंदाज घेणे आणि नात्यांपेक्षा अहंकाराला कधीही मोठे न मानणे, हीच खरी शहाणपणाची खूण आहे. जीवन आपल्याला प्रत्येक टप्प्यावर शिकवत असते की वेळ निघून गेल्यावर शहाणपण आले, तर त्याची किंमत कमी होते. म्हणून अनुभवाने नव्हे तर समजुतीने मोठे व्हावे. कारण आजचे तारुण्य उद्याचे वृद्धत्व घडवत असते. म्हणूनच, समय असतानाच समजूतदार बना. अशी जीवनशैली स्वीकारा की वृद्धापकाळात मागे वळून पाहताना पश्चात्ताप नव्हे, तर समाधानाची स्मितरेषा चेहऱ्यावर उमटेल. खरी कमाई संपत्तीची नसते; ती चांगल्या विचारांची, उत्तम संस्कारांची आणि जपलेल्या नात्यांची असते. हाच या कडव्या पण जीवनाला दिशा देणाऱ्या सत्याचा खरा संदेश आहे.●●

बहुजन सौरभ

# गुरुजी श्रीमंत झाले... पण शाळा अजूनही गरीबच !

काल परवा जिल्हा परिषदेच्या शाळा सुरू झाल्या... एका पडक्या, जीर्ण झालेल्या शाळेसमोरून जात होतो. तेवढ्यात शहरातून नव्या कोऱ्या चारचाकीतून, टापटीप सुटाबुटात गुरुजी आले. ते दृश्य पाहिले आणि मन अस्वस्थ झाले. सहजपणे वीस-पंचवीस वर्षांपूर्वीची आठवण झाली. तेव्हा गुरुजीही गरीब होते आणि शाळाही गरीब होती. पगार कमी असल्यामुळे गुरुजी गावातच राहायचे. गावाच्या प्रत्येक घराशी त्यांचे नाते होते. विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांशी संवाद होता. मुलगा शाळेत आला नाही तर गुरुजी थेट घरी जायचे. त्या कौलारू, मातीच्या भिंती असलेल्या शाळांनी या देशाला आयएएस, डॉक्टर, अभियंते, सैनिक, शास्त्रज, उद्योगपती दिले. त्या शाळांनी देश घडवला. त्याकाळी घरात बापाचा जितका दरारा होता, तितकाच गुरुजींचाही होता. काही ठिकाणी तर देवापेक्षाही गुरुजींचा मान मोठा होता. मग काळ बदलला... गुरुजींचे दिवस पालटले. मोठे पगार झाले. शहरात घरे झाली. गाड्या आल्या. सुखसोयी आल्या. हे सगळे योग्यच आहे, त्याचा आनंदच आहे. पण एक प्रश्न मनाला सतावत राहतो. गुरुजींचे दारिद्र्य संपले. मग शाळेचे दारिद्र्य का संपले नाही? शाळेचे छप्पर अजूनही गळतेय. भिंती अजूनही पडतायत. पटसंख्या कमी होत चालली आहे आणि तब्बल १७ हजार जिल्हा परिषद शाळा कायमच्या बंद पडल्या. ही केवळ शाळा बंद झाली नाहीत. ही गरीबांच्या स्वप्नांची दारे बंद झाली. ही हजारो गावांच्या भविष्याची हत्या झाली. ही लाखो मुलांच्या संधींची गळचेपी झाली. आज परिस्थिती इतकी दयनीय झाली आहे की शाळेला फुगे लावून, रॅली काढून, गुलाबाचे फुल देऊन पालकांना विनंती करावी लागते. ‘कृपया आपल्या मुलाला आमच्या जि. प. शाळेत प्रवेश द्या.’ गरीब बाप आजही कर्ज काढून मुलाला खाजगी शाळेत पाठवतो. कारण त्याला विश्वास राहिलेला नाही. त्याला वाटते, ‘मी गरीब आहे, पण माझे मूल तरी गरीब राहू नये.’ ही वेळ का आली? फक्त सरकार जबाबदार आहे का? माझा प्रश्न माझ्या सर्व शिक्षक मित्रांना आहे. सरकारची वाट किती दिवस पाहणार? तुमच्या पगारातील एक टक्का रक्कम वर्षातून एकदा आपल्या शाळेसाठी खर्च केली तर काय बिघडेल?



सागर रामभाऊ तायडे
9920403859




गावातील माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणा. गावातून वर्गणी गोळा करा. शाळेच्या रंगरंगोटीपासून ग्रंथालयापर्यंत एखादा उपक्रम स्वतः उभा करा. निवृत्त शिक्षकांनाही माझी नम्र विनंती. तुम्ही प्रथम भारतीय बना. भारत माझा देश आहे आणि सर्व भारतीय माझे बांधव आहेत हे अंमलात आणा. विद्यार्थाची जात धर्म विसरणारे गुरुजी नसल्यामुळे जिल्हा परिषद शाळा बंद होत आहेत. म्हणूनच गुरुजींनी घरी बसून वेळ घालवण्यापेक्षा आठवड्यातून एक-दोन दिवस आपल्या जवळच्या जिल्हा परिषद शाळेत जा. दोन तास मुलांना शिकवा. तुमचा अनुभव ही त्या मुलांची मोठी संपत्ती आहे. लक्षात ठेवा. तुमची ओळख, तुमचा सन्मान, तुमचा पगार, तुमचे घर, तुमची गाडी या सगळ्याचा पाया त्या जिल्हा परिषद शाळेनेच घातला आहे. आज त्या शाळेला तुमची गरज आहे. सरकार बदलतील. धोरण बदलतील. अधिकारी बदलतील. पण गावातील शाळा वाचवायची असेल, तर शिक्षकांनी पुन्हा एकदा फक्त ‘नोकरी करणारे कर्मचारी’ न राहता ‘गुरुजी’ व्हावे लागेल. कारण शाळा वाचली तर गाव वाचेल. गाव वाचले तर समाज वाचेल आणि समाज वाचला तरच देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल राहील. ही सर्वच विद्यार्थी गुरुजी आणि पालकांची जबाबदारी आहे. विदर्भातील अनेक मित्र जिल्हा परिषद शाळा बंद होतात. त्या विरोधात गावागावात जन जागृती करीत आहेत. आपण शहरात राहत असला तरी गावातील जिल्हा परिषदची शाळा विसरू नका. तिथेच तुम्ही प्राथमिक शिक्षण घेऊन पुढे गेला आहात. आज शहरात सुरक्षित नोकरी करत असला तरी उद्याचे भविष्य तुमच्या हाती असणार आहे. हे प्रत्येकांनी लक्षात ठेवावे. जय संविधान, जय भारत, जय भिम.●●

# करुणेचा निःशब्द दूत ‘आलोका’
## बुद्धांच्या विश्वमैत्रीचा चार पायांवर चालणारा संदेश

सब्बे सत्ता सुखी होन्तु, सब्बे होन्तु च खेमिनो...’ (सर्व प्राणी सुखी होवोत. सर्व प्राणी सुरक्षित, निरामय आणि आनंदी राहोत.) भगवान बुद्धांच्या या मंगलकामनेत केवळ मानवजातीचाच नव्हे, तर संपूर्ण सजीव सृष्टीचाही समावेश आहे. बुद्धधम्मातील मेत्ता (मैत्री) आणि करुणा या संकल्पना माणसापुरत्या मर्यादित नाहीत. त्या प्रत्येक सजीवाला समान सन्मानाने जगण्याचा अधिकार देतात. म्हणूनच बुद्धांनी मानवकेंद्री नव्हे, तर जीवकेंद्री नैतिकतेचा मार्ग जगासमोर ठेवला. आज जगभर शांतता, अहिंसा आणि विश्वबंधुत्वाचा संदेश घेऊन निघालेल्या 'Walk for Peace' या आंतरराष्ट्रीय पदयात्रेत ही शिकवण प्रत्यक्ष अनुभवायला मिळते. या उपक्रमाचे नेतृत्व भदंत पञ्ञाकार करतात. चालत्या ध्यानातून, संवादातून आणि लोकांशी प्रत्यक्ष भेटीतून बुद्धांचा करुणामय धम्म जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. या यात्रेतील सर्वांत वेधक व्यक्तिमत्त्व मात्र प्रवचन करणारा भिक्खू नाही; तर ‘आलोका’ नावाचा एक श्वान आहे. २०२२ मध्ये भारतातील पदयात्रेदरम्यान कोलकात्याजवळील एका रस्त्यावर हा भटका श्वान भिक्खूंच्या मागे चालू लागला. त्याला कोणी बोलावले नव्हते; परंतु बुद्धाच्या धम्माने व संघाने म्हणजेच करुणेच्या अत्युच्च प्रवाहाने त्यालाही आपलेसे केले. अपघात झाला, आजारपण आले, तरी त्याने साथ सोडली नाही. अखेरीस वंदनीय भदंत पञ्ञाकार (मूळचे व्हिएतनामचे पण आता अमेरिकन नागरिक) यांनी त्याला आश्रय दिला आणि त्याचे नामकरण केले, 'आलोका', म्हणजे प्रकाश. तो सध्या जगभरात 'ग्लोबल पीस डॉग' (शांतता दूत) म्हणून ओळखला जातो. आज आलोकाने भारत, अमेरिका आणि श्रीलंका या देशांतील शांतता यात्रांमध्ये सहभाग घेतला आहे. २६ ऑक्टोबर २०२५ रोजी अमेरिकेतील टेक्सास राज्यातील फोर्ट वर्थ येथून भदंत पञ्ञाकार यांच्या नेतृत्वाखाली 'Walk for Peace' या जागतिक शांतता पदयात्रेला औपचारिक सुरुवात झाली. अमेरिकेतील १०८ दिवसांच्या ऐतिहासिक पदयात्रेनंतर हा उपक्रम श्रीलंकेत पोहोचला आणि आज तो एक आंतरराष्ट्रीय शांतता चळवळ म्हणून पुढे सुरू आहे. या संपूर्ण प्रवासात 'आलोका' हा करुणा आणि विश्वमैत्रीचे जिवंत प्रतिक बनला आहे. अमेरिकेतील सुमारे ३,७०० किलोमीटरच्या ऐतिहासिक पदयात्रेसाठी त्याने विमानप्रवासही केला. रस्त्यावर भटकणारा एक श्वान जगभर शांततेचा दूत म्हणून प्रवास करू लागला. याहून मोठे करुणेचे उदाहरण कोणते असू शकते? आलोका आज लाखो लोकांच्या प्रेमाचा विषय झाला आहे. लहान मुले त्याला पाहताच आनंदाने धावत येतात. महिला, पुरुष, वृद्ध त्याला प्रेमाने कुरवाळतात. तोही प्रत्येकाला शेपूट हलवत, डोळ्यांत विश्वास आणि निरागस स्नेह घेऊन प्रतिसाद देतो. त्याच्यासाठी कोणी परका नसतो. भाषा नाही, धर्म नाही, वर्ण नाही, राष्ट्रीयत्व नाही; फक्त मैत्री. आलोका कोणतेही प्रवचन देत नाही; पण त्याचे प्रेमळ, मैत्रीपूर्ण अस्तित्वच बुद्धधम्माचे सर्वांत प्रभावी प्रवचन ठरते. आज जगातील अनेक संघर्षांची मुळे आर्थिक नसून मानसिक आहेत. द्वेष, अहंकार, असहिष्णुता आणि ‘मी’पणाची भावना माणसाला माणसापासून दूर नेत आहे. विज्ञानाने अंतर कमी केले; पण आपली मने जवळ आणली नाहीत. अशा काळात एका श्वानाने हजारो अनोळखी लोकांना प्रेमाने जोडणे ही केवळ भावनिक घटना नाही; ती सद्धम्माच्या मानवी कल्याणाच्या संस्कृतीवर अत्यंत प्रभावीपणे भाष्य करणारी घटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात स्पष्ट लिहिले आहे की, समाज टिकविण्याची खरी शक्ती प्रज्ञा, करुणा आणि समता यांत आहे. कायदा माणसाला शिक्षा करू शकतो; परंतु माणसाला माणसाशी जोडू शकत नाही. समाजाला एकत्र ठेवणारे बंधन करुणेचे असते. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी बुद्धधम्माला आधुनिक, विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ आणि मानवतावादी समाजाचा आधार मानले. आलोका त्या विचारांचेच सजीव रूप वाटतो. तो आपल्याला सांगतो की, तथागत गौतम बुद्धांची करुणा ही दुर्बलतेची नव्हे, तर सर्वोच्च नैतिक सामर्थ्याची अभिव्यक्ती आहे. प्रत्येक जीवाशी मैत्री करणे म्हणजेच बुद्धांना वंदन करणे. प्रत्येक प्राण्याच्या अस्तित्वाचा सन्मान करणे म्हणजेच धम्म आचरणात आणणे. आज प्रश्न एवढाच आहे की आपण बुद्धांच्या मूर्तीसमोर नतमस्तक होतो; पण बुद्धांच्या करुणेसमोरही नतमस्तक होतो का? आलोका आपल्याला हाच धडा शिकवतो. तो कोणतेही प्रवचन देत नाही, कोणतीही भाषा बोलत नाही, कोणताही ग्रंथ वाचत नाही; तरी त्याचे संपूर्ण अस्तित्व बुद्धाच्या धम्माचे सुंदर प्रकटीकरण बनले आहे. आलोकाच्या निःशब्द पावलांतून जगाला मिळणारा संदेश अत्यंत स्पष्ट आहे. शांततेकडे जाणारा रस्ता करुणेतून जातो आणि करुणेचा मार्ग प्रत्येक सजीवापासून सुरू होतो. म्हणूनच आलोका हा केवळ एक श्वान नाही. तो बुद्धांच्या विश्वमैत्रीचा जिवंत संदेश आहे. करुणा हीच खरी संस्कृती आहे, अहिंसा हीच खरी शक्ती आहे आणि प्रेम हीच सर्वात प्रभावी भाषा आहे. आपल्या शांत पावलांनी जगाला धम्म शिकवणारा असा हा निःशब्द धम्मदूत आहे, 'आलोका'!●●

इंजी. जागेश सोमकुवर
मो. ९४३५७१७२९०



## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १९७



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मकरधोकडा उमरेड जिल्हा नागपूर.

उमरेड तालुक्यातील मकरधोकडा बाजारपेठेचे गाव असून येथिल एकाच छत्राखाली तथागत भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्त्या आहेत. महाराष्ट्र राज्य विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जातीकरिता राखीव मतदारसंघ आहे. उमरेडमध्ये शेतकरी, शेतमजूर, कामगार बांधव आहेत. या ठिकाणी दिनविशेषला मोठ्या संख्येने नागरिक गोळा होतात. डॉ. बाबासाहेबांना वंदन करतात आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन घरी जातात. आपले मुक्तीदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत, ही जाणिव येथिल नागरिकांना आहे.

संवाद मित्र, राजू थुल
मो. 9423420031

# डॉ. भुवनेश्वरी मेहरे यांची डॉ. आंबेडकर कॉलेजच्या प्राचार्यपदी नियुक्ती



**नागपूर :** सोमवार दि. ६ जुलै २०२६ रोजी झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या बैठकीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या नियमित पदावर डॉ. भुवनेश्वर मेहरे यांची विद्यापीठ कायदा, विद्यापीठ अध्यादेश क्रमांक २४ मधील तरतुदीनुसार पुनर्स्थापित करण्यात आली. समितीच्या बैठकीत अध्यक्ष विलास गजघाटे, डॉ. राजेंद्र गवई, डॉ. कमल गवई, एन.आर. सुटे, डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. डी.जी. दाभाडे आणि भदंत नागदीपंकर हे उपस्थित होते. डॉ. भुवनेश्वरी मेहरे यांची विद्यापीठाच्या निवड समितीने १ जानेवारी २०२२ रोजी निवड केली होती. त्यानुसार त्या १३ एप्रिल २०२२ रोजी डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राचार्य म्हणून रुजू झाल्या होत्या. परंतु त्यांना समितीच्या माजी अध्यक्षांनी डॉ. आंबेडकर स्मारक समितीच्या मीटिंगमध्ये कोणताही निर्णय न घेता तसेच कोणतीही चौकशी न करता, बेकायदेशीरपणे त्यांना पदानवत केले होते. विशेष म्हणजे नागपूर विद्यापीठाची एप्रिल २०२७ पर्यंत प्राचार्य म्हणून मान्यता आहे.

# ठवरे कॉलनीत गटार लाईन फुटली; घरांमध्ये सांडपाणी, नागरिक संतप्त

**नागपूर :** उत्तर नागपूर विधानसभा मतदारसंघातील ठवरे कॉलनी परिसरात मुख्य गटार वाहिनी फुटल्याने संपूर्ण परिसरात गंभीर आरोग्यविषयक संकट निर्माण झाले आहे. फुटलेल्या गटारातून मैलायुक्त सांडपाणी रस्त्यांवरून वाहत असून अनेक घरांमध्येही शिरल्याने नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. परिसरात दुर्गंधी पसरली असून लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच कामावर जाणाऱ्या नागरिकांना सांडपाण्यातूनच ये-जा करावी लागत आहे.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, पावसाळ्यात दरवर्षी गटार वाहिनी तुंबणे किंवा फुटण्याचे प्रकार घडतात. मात्र, यंदा परिस्थिती अधिकच गंभीर झाली असून जुनी व जीर्ण झालेली ड्रेनेज लाईन आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी स्वतंत्र स्टॉर्म वॉटर ड्रेनेज व्यवस्था नसल्याने समस्या विकोपाला गेली आहे. अनेक घरांमध्ये गटाराचे पाणी शिरल्याने घरगुती साहित्याचे नुकसान झाले असून संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.



नागरिकांनी आरोप केला की, वारंवार तक्रारी करूनही नागपूर महानगरपालिकेकडून केवळ तात्पुरत्या स्वरूपाची दुरुस्ती केली जाते. कायमस्वरूपी उपाययोजना न केल्यामुळे काही दिवसांनी पुन्हा तीच परिस्थिती निर्माण होते. तक्रार करणाऱ्या नागरिकांना काही अधिकाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर 'द प्लॅटफॉर्म'चे सदस्य राजीव खोब्रागडे यांनी स्थानिक नागरिकांसह आमदार नितीन राऊत तसेच नागपूर महानगरपालिकेला निवेदन सादर करून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. निवेदनात जीर्ण झालेली मुख्य गटार वाहिनी युद्धपातळीवर बदलणे, रस्त्यांवरील सांडपाणी तात्काळ हटवून परिसराचे निर्जंतुकीकरण करणे तसेच निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात राजीव खोब्रागडे म्हणाले, 'सार्वजनिक रस्त्यांवर आणि नागरिकांच्या घरांमध्ये गटाराचे पाणी शिरणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करून नागरिकांना या असह्य त्रासातून मुक्त करावे; अन्यथा नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला जाईल.' ठवरे कॉलनीतील हा प्रश्न केवळ काही घरांपुरता मर्यादित नसून हजारो नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असल्याने प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी एकमुखी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## महत्वाचे

### अनागारिक धम्मपाल बौद्ध विहारात वॉटरप्रूफिंग व स्वच्छता मोहिम



**कोराडी :** महादुला येथील अनागारिक धम्मपाल बौद्ध विहाराच्या देखभालीसाठी आणि पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समारोह समिती, महामाया महिला मंडळ व अनागारिक धम्मपाल बौद्ध विहार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विहाराच्या स्लॅब व डोमच्या वॉटरप्रूफिंगसह स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. मागील दोन दिवसांपासून समितीचे पदाधिकारी व सदस्य श्रमदानातून विहार परिसराची स्वच्छता, छतावरील कचरा हटविणे तसेच डोमवर वॉटरप्रूफिंग कोटिंगचे काम करत आहेत. पावसाळ्यात पाणी गळती रोखून विहाराची वास्तू सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. समितीच्या या उपक्रमाचे परिसरातील बौद्ध बांधव व नागरिकांनी स्वागत केले असून, हे काम पुढील एक-दोन दिवसांत पूर्ण होणार आहे. अधिकाधिक नागरिकांनी या श्रमदान मोहिमेत सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन समितीच्या वतीने केले आहे.

### सहकार गौरव सोहळ्यात मुख्यमंत्रींचा सत्कार



**मुंबई :** आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व सहकारी महाराष्ट्र यांच्यावतीने यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे आयोजित सहकार गौरव पुरस्कार सोहळ्यात देवेंद्र फडणवीस यांचा बृहन्मुंबई बेरोजगार संस्था फेडरेशनचे कायदेविषयक सल्लागार तथा सचिव ॲड. प्रमोद सागर तायडे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सोहळ्याचे आयोजन प्रविण दरेकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. सहकार चळवळीला बळकटी देणारा आणि विविध घटकांना एकत्र आणणारा हा कार्यक्रम यशस्वी व प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### राष्ट्रीय चिकित्सक दिनानिमित्त ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञांचा सन्मान




**नागपूर :** नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा), नागपूर शाखेच्या वतीने राष्ट्रीय चिकित्सक दिनानिमित्त ज्येष्ठ व सेवाभावी वैद्यकीय तज्ज्ञांचा सत्कार तसेच सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण (सीएमई) प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले. स्थानिक केडीके अभियांत्रिकी महाविद्यालय, नंदनवन येथे झालेल्या या कार्यक्रमाला वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, डॉक्टर व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. प्रमोद मुंडडा यांनी भारतीय चिकित्सा पद्धतीचा समन्वय साधून रुग्णहिताला प्राधान्य देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी 'रक्तदाब आणि त्याचे व्यवस्थापन' या विषयावर उपस्थित डॉक्टरांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी निमा केंद्रीय सल्लागार डॉ. रविंद्र बोथरा प्रमुख उपस्थित होते. यावेळी वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे डॉ. प्रदीप कोल्हे, डॉ. रजना वाघमारे, डॉ. मिलिंद सूर्यवंशी, डॉ. राजेश उरमाले आणि डॉ. सविता शर्मा यांचा शाल, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. निमा नागपूरचे अध्यक्ष डॉ. नितीन कान्होलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संचालन डॉ. अभय कडू व डॉ.अभिषेक चतुर्वेदी यांनी केले, तर सचिव डॉ. शरद ठाकूर यांनी आभार मानले.

## निधन वार्ता

### सौरभ सतीश आमटे



**नागपूर :** मनीष नगर येथील रहिवासी सौरभ आमटे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने अचानक निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय 45 वर्षांचे होते. रविवारी अंतिम संस्कार सहकार नगर घाटावर करण्यात आले. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# आरटीई प्रतिपूर्ती ३५ हजार करण्याची मागणी

## आंदोलनानंतर शिक्षण संचालकांसोबत सकारात्मक चर्चा



**पुणे/नागपूर :** आरटीई (२५ टक्के प्रवेश) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सुमारे ३,००० कोटींच्या प्रलंबित प्रतिपूर्तीमुळे विनाअनुदानित शाळांवर आर्थिक संकट ओढवल्याच्या पार्श्वभूमीवर आरटीई फाऊंडेशन इंडिया तर्फे मंगळवारी पुणे येथील शिक्षण संचालक तथा शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. नागपुरातील प्रा.सचिन काळबांडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने शिक्षण संचालक शरद गोसावी यांची भेट घेऊन प्रतिपूर्तीची थकबाकी, शाळांवरील आर्थिक भार व विद्यार्थ्यांच्या सुविधांबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी प्रति विद्यार्थी ३५ हजार प्रतिपूर्ती मंजूर करणे, फी रेग्युलेशन ॲक्टनुसार दर दोन वर्षांनी १५ टक्के वाढ, प्रतिपूर्तीची रक्कम वेळेत शाळांच्या खात्यात जमा करण्यासाठी पारदर्शक यंत्रणा, इयत्ता १ ते ८ पर्यंत शिक्षण पूर्ण करणे अनिवार्य करणे, पावसाळी अधिवेशनात स्वतंत्र निधीची तरतूद करून ३,००० कोटींची थकबाकी तातडीने वितरित करणे, बोगस प्रवेशांवर कारवाई, विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पाठ्यपुस्तके, खासगी शाळांतील शिक्षकांना कॅशलेस मेडिक्लेम आणि विनाअनुदानित शाळांना आवश्यकतेनुसार अनुदान देण्याची मागणी करण्यात आली. चर्चेनंतर शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी मागण्यांचे निवेदन शासनाकडे पाठविण्याचे आदेश दिले. आंदोलनात राज्यभरातील शाळा संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले. शासनाने लाखो विद्यार्थ्यांच्या हितासाठी व विनाअनुदानित शाळांच्या अस्तित्वासाठी या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी प्रा.सचिन काळबांडे यांनी प्रसिद्धीच्या मध्यमांद्वारे व्यक्त केली आहे.



# निळाई परिवाराचे संथागार वृद्धाश्रमाला साहित्य व आर्थिक सहकार्य

**नांदेड (किनवट) :** निळाई परिवाराच्या वतीने किनवट येथील संथागार वृद्धाश्रमाला भेट देऊन वृद्धांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे वाटप तसेच आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी वृद्धाश्रमाचे अध्यक्ष अरुण आळणे यांनी पुष्पगुच्छ देऊन निळाई परिवाराचे स्वागत केले.

वृद्धाश्रमाच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षा आळणे यांनी निळाई परिवाराचे आभार मानत, 'निळाई परिवार हा संथागारच्या कुटुंबाचा भाग आहे,' असे सांगितले. या उपक्रमासाठी जॉगर बाईज सिनियर सिटीजन, इंदोरा, पँथर महिला बचत गट, वंजारी व कांबळे परिवार तसेच डॉ. सुनंदा रामटेके, डॉ. स्नेहा चव्हाण, प्रा. राजेंद्र कांबळे, नरेश पाटील, अमरदीप पाझारे, निर्मला जिवने, सुरेश वंजारी, प्रवीण कांबळे, शरद कांबळे, आत्माराम ढोक आदींनी साहित्य व आर्थिक स्वरूपात सहकार्य केले. यावेळी उपस्थितांनी सामाजिक जाणीवेतून चालविल्या जाणाऱ्या संथागार वृद्धाश्रमाच्या कार्याचे कौतुक केले. अरुण आळणे व त्यांच्या सहकाऱ्यांकडून वृद्धांची आई-वडिलांप्रमाणे सेवा केली जात असल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव केला.

# एकल महिला दिनानिमित्त जनजागृती व कायदेशीर मार्गदर्शन



**नागपूर :** आंतरराष्ट्रीय एकल महिला दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या झोन क्र.२ अंतर्गत समाज विकास विभाग व समुपदेशन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन २३ जून रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी झोन क्र. २ च्या सभापती धनश्री देशपांडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी सभापती धनश्री देशपांडे यांनी आपल्या भाषणात एकल महिलांबद्दल आपले मनोगत व्यक्त केले व चांगल्या पद्धतीने महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी समाज विकास विभागाच्या समूह संघटिका अनिता वरघट, समुपदेशन केंद्राच्या संचालिका नंदा कोल्हटकर तसेच समुपदेशन केंद्राचे ॲड. सरोज मुन आदी मान्यवर उपस्थित होते. ॲड. सरोज मुन यांनी एकल महिलांचे कायदेशीर हक्क, घटस्फोट, अविवाहित व विधवा महिलांना उपलब्ध असलेल्या योजनांची माहिती देत मार्गदर्शन केले. तसेच समुपदेशन केंद्राच्या समुपदेशक अनिता वरघट हीने महिलांना शासकीय योजनांबाबत सविस्तर माहिती दिली तर नंदा कोल्हटकर यांनी कौटुंबिक कलह, घटस्फोट, घरगुती हिंसाचार, बालकांवरील अत्याचार याबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमात एकूण ६३ महिलांनी सहभाग नोंदविला. उपस्थित महिलांसाठी बसण्याची तसेच चहा-नाश्ता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या सरते शेवटी बबीता हिंगणेकर हिने आभार व्यक्त केले व कार्यक्रमाची सांगता झाली.



# धम्म दीक्षा संस्कार कार्यक्रमांची गरज : डॉ. सरोज वाणी

**नागपूर :** बीडीएसपीच्या लष्करीबाग युनिटच्या वतीने आयोजित धम्म दीक्षा संस्कार विधी कार्यक्रमात डॉ. सरोज वाणी यांनी प्रत्येक बौद्ध कुटुंबाने आपल्या घरी धम्म दीक्षा संस्कार कार्यक्रम आयोजित करून मुलांमध्ये बौद्ध धम्माचे संस्कार रुजविण्याची गरज व्यक्त केली. यावेळी त्यांनी सांगितले की, मुलांना जन्म देणे हीच पालकांची जबाबदारी नसून त्यांना सुसंस्कृत, जबाबदार आणि मानवतावादी नागरिक बनविण्यासाठी योग्य संस्कार देणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेल्या आदर्श समाजाच्या निर्मितीसाठी बालवयात धम्म दीक्षा देणे उपयुक्त ठरेल, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात प्रिया दिलीप धोंगळे यांच्या आठ वर्षीय मुलगा संजित धोंगळे याचा धम्म दीक्षा संस्कार विधी पार पडला. पंचशील व बावीस प्रतिज्ञांचे वाचन करून त्याला धम्मदीक्षा दिली.

माधुरी जयवर्धन यांनी बीडीएसपी संघटनेची भूमिका मांडली, तर डॉ. नीरज बोधी, शाक्य, आर्य आणि गौतम यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन अमिता मेश्राम यांनी, तर आभार प्रदर्शन सुशिला कोटांगले यांनी केले. विविध कार्यकर्त्यांच्या सहकार्याने पार पडलेल्या या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपासक-उपासिका उपस्थित होते.

# आधुनिक भारतासाठी अभ्यासक्रमात आंबेडकरवाद आवश्यक : बी.बी. मेश्राम



**छत्रपती संभाजीनगर :** फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वर्धापनदिनानिमित्त १७८ वी मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा उत्साहात पार पडली.

कार्यशाळेच्या अध्यक्षीय समारोपात बी. बी. मेश्राम यांनी सामाजिक लोकशाहीवर आधारित आधुनिक भारत घडविण्यासाठी 'केजी ते पीजी' अभ्यासक्रमात आंबेडकरवादाचा समावेश करण्याची गरज व्यक्त केली. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या नियमावलीचे काटेकोर पालन करणारे सक्षम नेतृत्व निर्माण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. सुधाकर नवसागर, ॲड. राहुल गायकवाड, इंजि. अशोक मेश्राम यांच्यासह विविध मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक दूरदृष्टी, पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे योगदान आणि वैचारिक सबलीकरणाच्या गरजेवर विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष ठोकळ यांनी संचालन ॲड. सुनील कुमार नागवंश यांनी, तर आभार ॲड. राहुल डी. गायकवाड यांनी मानले.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या महिला अध्यक्षपदी रत्नमाला पिसे यांची नियुक्ती



**हिंगणा :** बेंगलुरु येथे होणाऱ्या ११व्या राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या तयारी निमित्ताने राष्ट्रीय आणि जिल्हास्तरीय पदाधिकारी यांची बैठक डॉ. बबनराव तायवाडे यांचे निवासस्थानी त्यांचे अध्यक्षतेखाली झाली. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या रत्नमाला पिसे यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या राष्ट्रीय महिला अध्यक्ष पदावर नियुक्ती देण्यात आली. उपस्थितांना महासचिव सचीन राजुरकर यांनी मार्गदर्शन केले. अधिवेशनाला कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री यांना आमंत्रित करण्यात येत असुन त्यांचेसोबत इतर राज्यांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. आपल्या मार्गदर्शनात डॉ. तायवाडे यांनी देशातील सर्व ओबीसी नेत्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले. जनगनने संदर्भात रामलीला मैदानावर ओबीसीचे भव्य आंदोलन करण्यात येणार आहे. यासाठी सर्वांनी तयारीत रहावे असे सांगितले. महासंघाचे अधिवेशन बेंगलुरु येथील ज्ञानज्योती सभागृह डॉ. मनमोहनसिंह , बेंगलुरु विद्यापीठ क्रांतीवीर सांगोला जवळ के. एस. आर. रेल्वे स्टेशन बेंगलुरु येथे ७ ऑगस्टला आयोजित करण्यात आले आहे.

या अधिवेशनाच्या निमीत्ताने स्टिकर प्रकाशित करण्यात आले. या बैठकीच्या निमित्ताने नवीन नियुक्ती केली आहे. देशातील अनेक राज्यांतील ओबीसी नेत्यांना आमंत्रीत करण्यात आले आहे. या बैठकीला बुलढाणा, चंद्रपुर, छिंदवाडा, जळगाव या जिल्ह्यातून पदाधिकारी उपस्थित होते. प्रत्येकाला आजीवन सभासद करण्याची विनंती करण्यात आली. शहरातील केंद्रीत सचिव शरद वानखेडे, कोषाध्यक्ष गुणेश्वर आरीकर, परमेश्वर राऊत, शकील पटेल, राहुल करांगळे यांनी देणगीची सुरुवात केली. बैठकीचे आभार डॉ. राजीव गोसावी यांनी केले. नवनियुक्त पदाधिकाऱ्याचे सर्वांनी अभिनंदन केले.



# बांधकाम कामगार मंडळातील कथित भ्रष्टाचाराची चौकशीची मागणी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील कथित भ्रष्टाचार, मनमानी कारभार आणि पारदर्शकतेच्या अभावाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी 'महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समिती'ने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

कृती समितीचे अध्यक्ष सागर तायडे व निलेश केवट यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नोंदणीकृत कामगारांना योजनांचा लाभ तातडीने द्यावा, भ्रष्टाचाराचे केंद्र ठरल्याचा आरोप असलेली तालुका कामगार सुविधा केंद्रे बंद करावीत, मंडळाचे सोशल ऑडिट करावे, सेवाहमी कायदा लागू करावा, अटल बांधकाम आवास योजना सुरू करावी तसेच कायमस्वरूपी कर्मचारी भरतीसह विविध ११ मागण्या मांडल्या. राज्यभरातील विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648